
पाक्षिक

# मनोगत

प्रदेश बीजेपी

मुंबई । वर्ष: 6
अंक: 10
16 मे, 2024
पृष्ठसंख्या: 36
किंमत: 5 रू.



# फिर एक बार मोदी सरकार





## अध्यक्षीय मनोगत

# फिर एक बार मोदी सरकार


पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची प्रचंड लाट या लोकसभा निवडणुकीत अनुभवायला मिळत आहे. विदर्भ, मराठवाड्यात भर उन्हाळ्यात दुपारी झालेल्या त्यांच्या सभेलाही प्रचंड गर्दी झाली. लोक त्यांना ऐकायला उत्सूक असतात. मोदीजी भाषणाला उभे राहिले की मोदी... मोदी... असा उत्स्फूर्त गजर सुरू होतो. २०१४ साली मोदीजींच्या नेतृत्वात भारतीय जनता पार्टीने लोकसभेची निवडणूक लढविली आणि जिंकली. त्यावेळी ठिकठिकाणी सभेमध्ये उपस्थितांकडून मोदी... मोदी... असा मोदीजींच्या नावाचा गजर होत असे. तसाच अनुभव आताही येत आहे. त्यावेळी भाजपाने लोकसभेच्या २८२ जागा जिंकून पूर्ण बहुमत मिळविले. हा एक चमत्कारच होता. देशामध्ये १९८४ च्या लोकसभा निवडणुकीनंतर २०१४ पर्यंत कोणत्याही पक्षाला किंवा निवडणूकपूर्व आघाडीला लोकसभा निवडणुकीत २७२ जागा ओलांडून पूर्ण बहुमत मिळाले नव्हते. तीस वर्षांनी मोदीजींच्या नेतृत्वात प्रथमच एका पक्षाला लोकसभा निवडणुकीत बहुमत मिळाले. राजकीय जाणकार सांगत होते की, देशामध्ये एका पक्षाला बहुमत मिळण्याचा काळ गेला, आता आघाडी सरकारे अपरिहार्य आहेत. पण मोदीजींच्या नेतृत्वामुळे या जाणकारांचे अंदाज खोटे ठरले आणि २०१४ साली भाजपाला पूर्ण बहुमत मिळाले. त्यानंतर पुन्हा २०१९ साली लोकसभा निवडणुकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना जनतेने अधिक जागा आणि अधिक मते देऊन आशिर्वाद दिला. हे सुद्धा एक आश्चर्यच होते. सत्तेतील पक्षाच्या बाबतीत अपेक्षाभंगामुळे जनतेमध्ये नाराजी निर्माण होते व त्याचा फटका सत्ताधारी पक्षाला बसतो, त्याला जाणकार लोक अँटी इनकम्बन्सी म्हणतात. २०१९ मध्येही तसाच अँटी इन्कंबन्सीचा फटका बसून भाजपाच्या जागा कमी होतील, असे अंदाज वर्तवले गेले पण प्रत्यक्षात तसे काही घडले नाही. मोदीजींच्या नेतृत्वामुळे प्रस्थापित राजकीय ठोकताळे पुन्हा चुकीचे ठरले. सध्या चालू असलेल्या २०२४ च्या लोकसभेच्या निवडणुकीत पुन्हा एकदा इतिहास घडणार आहे. मतदानाच्या आकडेवारीबाबत चुकीची आणि अर्धवट माहिती देऊन काहीजणांनी अपप्रचार सुरू केला आहे. भाजपा हमखास जिंकणार या जनभावनेला धक्का देण्याचा प्रयत्न त्यांनी चालविला आहे. पण विरोधकांचे मनसुबे सफल होणार नाहीत. स्वच्छ पारदर्शी कारभार तसेच सर्वसामान्य माणूस केंद्रबिंदू मानून विकासयोजनांची प्रभावी अंमलबजावणी यामुळे जनता मोदीजींच्या पाठीशी आहे. देशाच्या उज्ज्वल भवितव्यासाठी मोदीजींना तिसऱ्यांदा पंतप्रधान करण्याचा निर्णय जनतेने घेतला आहे. त्यामुळेच दहा वर्षे सरकार चालवूनही मोदीजींच्या विरोधात अँटी इन्कंबन्सी नाही तर उलट सरकार समर्थनाची भावना म्हणजे प्रो इन्कंबन्सी आहे. दहा वर्षांनंतरही मोदी लाट कायम आहे. किंबहुना ती वाढली आहे. त्यामुळेच फिर एक बार मोदी सरकार... हे होणारच आहे. राज्यात लोकसभा निवडणुकीचे चार टप्पे संपले आहेत. हा अंक प्रसिद्ध होईपर्यंत पाचवा टप्पाही झाला असेल. आता चार जून रोजी विजयाचा जल्लोष करायचा आहे. फिर एक बार... मोदी सरकार !

**चंद्रशेखर बावनकुळे**

# अंतरंग




०४ बाळासाहेबांचा वारसा सांगण्याचा उद्धव ठाकरेंना अधिकारच नाही






११ मुस्लिमांनी आत्मपरीक्षण करावे...





१२ 400 जागांचे उद्दिष्ट साध्य करणार


१५ मोदी सरकारच्या कामगिरीवरच मतदारांपुढे गेलो आहोत





१८ मोदींच्या मागे महाराष्ट्रातील 'डिअर'ची पॉवर





२० देशहिताला सर्वोच्च प्राधान्य






संपादक : गणेश हाके

सल्लागार : माधव भांडारी

आ. अतुल भातखळकर

@manogatbjp


सर्व भाजपा हितचिंतक, कार्यकर्ते आणि वाचकांना विनंती आहे की आपण आपल्या प्रतिक्रिया,
bjpmaha.manogat@gmail.com
editor.bjpmanogat@gmail.com
येथे पाठवाव्यात.


**संपादकीय सल्लागार**

चंद्रहास मिरासदार

सजावट व मांडणी : गौतम आर्य

सहाय्यक : प्रेरणा तळेकर-वीर

**विभागीय समन्वयक**

मराठवाडा (छत्रपती संभाजीनगर) : श्रीनिवास कुलकर्णी

विदर्भ: दीपक माई, त्रिकाल अडसड, प्रवीण गमे

पश्चिम महाराष्ट्र: संजय मयेकर

उत्तर महाराष्ट्र: गोविंद बोरसे

हे पाक्षिक भारतीय जनता पार्टीसाठी प्रकाशक, मुद्रक, मुकुंद कुलकर्णी यांनी विवेक मुद्रणालय, ५, कामत इंडस्ट्रीयल इस्टेट, ३९६, वीर सावरकर मार्ग, प्रभादेवी, मुंबई - ४००० २५ येथे छापून भारतीय जनता पार्टी, प्रदेश कार्यालय, जीवन बीमा मार्ग, वसंतराव भागवत चौक, सी.डी.ओ. बॅरेक नं.१, मुंबई -२० येथे प्रकाशित केले. संपर्क : ०२२-२२०२२०५०

# बाळासाहेबांचा वारसा सांगण्याचा उद्धव ठाकरेंना अधिकारच नाही



एकनाथ शिंदे असोत किंवा अजित पवार हे आमच्या विरोधकांच्या राजकारणाला कंटाळले होते आणि आता आपला देश योग्य त्या मार्गाने विकास करत असल्याची त्यांची खात्री झाली त्यामुळेच ते आमच्यासोबत आले आहेत, असे परखड मत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केले. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान मोदी यांनी लोकमत समूहाला विशेष मुलाखत दिली. लोकमत समूहाचे सह-व्यवस्थापकीय संचालक आणि संपादकीय संचालक ऋषी दर्डा, समूह संपादक विजय बाविस्कर, मुंबई आवृत्तीचे संपादक अतुल कुलकर्णी आणि लोकमत व्हिडीओचे संपादक आशिष जाधव यांनी पंतप्रधानांना अनेक मुद्द्यांवर बोलते केले. पंतप्रधानांच्या निवासस्थानी ही मुलाखत पार पडली.

**या** मुलाखतीत सध्या प्रचारात भाजपचा प्रमुख मुद्दा असलेल्या विकसित भारत, रोजगाराचे प्रश्न, सरकारच्या प्राधान्यक्रमावर महाराष्ट्राचे असलेले स्थान, पवार कुटुंबात पडलेली फूट, उद्धव ठाकरे यांना सोबत घेणार का, एकनाथ शिंदे, अजित पवार भाजपसोबत का आले, अशा अनेक कळीच्या मुद्द्यांवर पंतप्रधान मोदी यांना बोलते केले. २०४७ पर्यंतचा विकसित भारत आणि त्या दृष्टीने सरकारतर्फे सुरू असलेले काम यावर भाष्य करतानाच विरोधकांचाही मोदी यांनी समाचार घेतला. लहान पक्ष काँग्रेसमध्ये विलीन करण्यासंदर्भात अलीकडेच शरद पवार यांनी केलेल्या विधानावरही पंतप्रधानांनी परखड भाष्य केले. ज्या पवारांनी काँग्रेसमधून बाहेर पडत स्वतःचा पक्ष स्थापन केला त्यांना पुन्हा स्वतःचा पक्ष काँग्रेसमध्ये विलीन करावासा का वाटत आहे?, त्यांच्या या विधानामागे बारामतीच्या निकालाचे काही संकेत आहेत का?, असा प्रश्न मोदी यांनी उपस्थित केला. तर, बाळासाहेब ठाकरे यांच्याबद्दल माझ्या मनात नितांत आदर आहे. मात्र त्यांचा वारसा सांगणारे लोक त्यांच्या तत्त्वांना हरताळ फासत आहेत. बाळासाहेबांना हे रुचले असते का? अशा शब्दांत त्यांनी उद्धव ठाकरे यांच्यावरही टीका केली.

राज ठाकरे यांना सोबत का घेतले, प्रचारात मंगळसूत्र, पाकिस्तान हे मुद्दे कसे आले, भाजपा सत्तेत आल्यास संविधानात बदल करेल, ही विरोधक जनतेच्या मनात घालत असलेली भीती, काँग्रेसचा जाहीरनामा या सर्व मुद्द्यांवरही मुलाखतीत पंतप्रधानांनी परखड भाष्य केले. इंडी आघाडीकडे पंतप्रधानपदासाठी उमेदवारच नाही. एकीकडे ते आघाडीतील घटक पक्ष म्हणतात आणि दुसरीकडे त्यांच्याच विरोधात निवडणूक लढवतात. महाराष्ट्रातीलच नव्हे तर देशातील जनता एखाद्या अनोळखी, विश्वास नसलेल्या व्यक्तीच्या हाती आपले भविष्य सोपवणार नाही, अशा शब्दांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विरोधकांच्या इंडी आघाडीवर जोरदार टीका केली.

**प्रश्न: महाराष्ट्रात उद्धव ठाकरे यांनी मला आता खोट्या प्रेमाची गरज नाही, असे विधान केले आहे. त्यामुळे एक थेट प्रश्न विचारतो. भाजप आणि उद्धव ठाकरे एकत्र येतील का?**

**उत्तर:** मला बाळासाहेब ठाकरे यांच्याबद्दल प्रचंड आदर आहे. त्यांचा वारसा पुढे नेण्याचे काम आम्ही करत आहोत. आपल्या देशाच्या इतिहासातील ते अत्यंत प्रमुख आणि प्रभावी नेते आहेत. बाळासाहेबांनी आयुष्यभर राष्ट्रहिताचे राजकारण केले. तुष्टीकरणाच्या राजकारणाचा त्यांनी विरोध केला. राजकारण काहीही असले तरी बाळासाहेबांच्या कुटुंबीयांतील प्रत्येक सदस्याबाबत मी प्रतिष्ठा कायम राखली आहे. बाळासाहेबांचा चाहता म्हणून मीच नाही तर त्यांच्या अनेक चाहत्यांना त्यांचा वारसा सांगणाऱ्या लोकांची कृती पाहून वेदना होत आहेत. मुंबई आणि तेथील जनता बाळासाहेबांच्या जिव्हाळ्याची होती. मुंबई बॉम्बस्फोटांच्या आरोपींना सोबत घेऊन त्यांचे उमेदवार प्रचार करत असल्याचे पाहून बाळासाहेबांना काय वाटले असते? ज्या लोकांनी सनातन धर्माचा विरोध केला, अशा लोकांसोबत गेल्याचे पाहून बाळासाहेबांना कसे वाटले असते? औरंगजेबाचा जयजयकार आणि सावरकरांचा अपमान करणाऱ्या लोकांसोबत युती केल्याचे बाळासाहेबांना रुचले असते का? अशा गोष्टी केल्यानंतर बाळासाहेबांचा वारसा सांगण्याचा त्यांना हक्क आहे का? सत्तेपेक्षा बाळासाहेबांनी कायमच तत्त्वे जपली. आता मात्र लोकांना सत्ता हेच सर्वकाही वाटते.यावर मी अधिक काय बोलणार?

**प्रश्न: राजकारण वेगळे आणि कुटुंब वेगळे. आपण मोठे आहात. अजित पवार यांना सोबत घेतल्यामुळे पवार कुटुंब तुटेल याचा आपल्याला अंदाज नव्हता का? भाजपासोबत येण्यासाठी शरद पवार यांच्याशी कधी चर्चा झाली होती का?**

**उत्तर:** शरद पवार हे अत्यंत वरिष्ठ आणि अनुभवी नेते आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये किंवा त्यांच्या कुटुंबात जे काही झाले त्याचे उत्तर तेच देऊ शकतात. मात्र, राष्ट्र प्रथम आणि विकासावर आधारित राजकारण ज्यांना करायचे आहे त्यांच्यासाठी एनडीएचे दरवाजे कायमच खुले आहेत. अजित पवार असोत किंवा एकनाथ शिंदे; ते एनडीएमध्ये आले याचे कारण म्हणजे, विरोधकांच्या नकारात्मक राजकारणाला ते कंटाळले होते. आपला देश आता योग्य मार्गाने विकास करत असल्याची त्यांची खात्री झाल्यामुळेच ते आमच्यासोबत आले. मला शरद पवार यांचे आश्चर्य वाटते. ते म्हणतात की, भविष्यात लहान पक्षांनी काँग्रेसमध्ये विसर्जित व्हावे. यातून बारामतीच्या निवडणुकीचे काही संकेत मिळत आहेत का? की, ज्या पद्धतीने संपूर्ण राज्य मतदान करत आहे ते पाहून त्यांना



नैराश्य आले आहे का? नाही तर, ज्या शरद पवारांनी काँग्रेस सोडून स्वतःचा पक्ष स्थापन केला, तेच शरद पवार आता पुन्हा त्याच काँग्रेसमध्ये विलीन होण्याची भाषा का करत आहेत? हा मलाच पडलेला प्रश्न आहे.

**प्रश्न: एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्री केल्यानंतर देवेंद्र फडणवीस थोडे निराश झाले होते. तुम्ही त्यांची समजूत काढलीत. त्यानंतर ते उपमुख्यमंत्री झाले. त्यांच्यासाठी पुढील योजना काय आहे?**

**उत्तर:** भाजपा हा केडरबेस पक्ष आहे. आमचे कार्यकर्ते राष्ट्रहितासाठी आणि जनकल्याणासाठी एका भावनेने काम करतात. आमच्या पक्षातर्फे कार्यकर्त्याला जे सांगितले जाते ते स्वखुशीने करणे ही आमच्या कार्यकर्त्यांची ओळख आहे. आता अलीकडचेच पहा, अनेक राज्यांत आमच्या नेत्यांनी जिथे राज्याची धुरा सांभाळली त्यांना पक्षाने जेव्हा दुसरी जबाबदारी दिली तेव्हा त्यांनी ती स्वीकारली.

भाजपाने देवेंद्र फडणवीस यांना ज्यावेळी मुख्यमंत्रिपदाची धुरा सांभाळण्यास सांगितले, त्यावेळी त्यांनी भाजपाचा कार्यकर्ता म्हणून ते कर्तव्य पार पाडले. त्यांनी महाराष्ट्रातील जनतेसाठी उत्तम काम केले. मुख्यमंत्रिपदाचा पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करणारे गेल्या अनेक वर्षांतले देवेंद्र फडणवीस हे एकमेव मुख्यमंत्री आहेत. त्यांच्या पाच वर्षांच्या कालावधीमध्ये महाराष्ट्राने सर्वच क्षेत्रांत उत्तम विकास केला. आता पक्षाने त्यांना दुसरी जबाबदारी दिलेली आहे. ते अत्यंत मन लावून ती जबाबदारी पार पाडत आहेत. ही भाजपाची संस्कृती आहे. महाराष्ट्रात सुशासन राखणे हे देवेंद्र फडणवीस यांचे मुख्य ध्येय आहे. ते मुख्यमंत्री आहेत की उपमुख्यमंत्री यापेक्षादेखील ते महाराष्ट्रात सुशासन राखत आहेत हे महत्त्वाचे आहे.

**प्रश्न: लोकांच्या मनात प्रश्न आहे की, भाजपाला विजयाची एवढी खात्री होती तरी त्यांनी राज ठाकरे यांना सोबत का घेतले?**

**उत्तर:** मी आधीच सांगितल्याप्रमाणे देशाला जो सर्वोच्च प्राधान्य देतो, त्याचे आम्ही नेहमीच स्वागत करतो. गेल्या १० वर्षांपासून आम्ही स्वबळावर बहुमतात आहोत. मात्र, तरीही आम्ही कायमच नव्या मित्रांचे स्वागत केले आहे. आपल्या लोकशाहीसाठी हे चांगले आहे. अधिकाधिक राजकीय पक्षांनी एकत्र येऊन लोकांच्या कल्याणासाठी काम करणे केव्हाही चांगलेच असते. राज ठाकरे आमच्यासाठी नवीन नाहीत. त्यांनी यापूर्वीही आम्हाला पाठिंबा दिला आहे. आम्ही देशासाठी चांगले काम केले आहे, यावर त्यांचा विश्वास आहे. आमच्या विचारांना तसेच आमच्या द्रष्टेपणाला ते पाठिंबा देतात. महाराष्ट्राच्या विकासातही ते हातभार लावू शकतील, असे आम्हाला वाटते. त्यामुळे हे एकत्र येणे केवळ सत्तेसाठी किंवा राजकीय गणितांसाठी आहे, असे नाही. लोकसेवेसाठी एकत्र येणे, हा त्यामागचा उद्देश आहे. देशहितासाठी जे आमच्याकडे येतील, त्या प्रत्येकाचे आम्ही स्वागतच करू.

**प्रश्न: अलीकडे तुम्ही प्रचारात प्रादेशिक नेत्यांवर टीका करत असता. यापूर्वी तुम्ही राष्ट्रीय नेत्यांना लक्ष्य करत असत. असे का?**

**उत्तर:** तुम्ही जर माझ्या भाषणांकडे बारकाईने पाहिले तर आमच्या सरकारने काय चांगले काम केले आहे, हे सांगण्यावर माझा अधिक भर असतो. प्रथमतः मी कोणत्याही नेत्यांना लक्ष्य करत नाही. तर राजकीय नेत्यांच्या विचारधारा आणि त्यांच्या कृती यासंदर्भात मी प्रश्न उपस्थित करत असतो. मी जेव्हा तेलंगणात जातो त्यावेळी तिथे काँग्रेसने करून ठेवलेल्या चुका मी लोकांच्या निदर्शनास आणून देतो. त्याचवेळी बीआरएसने तेलंगणाची कशी दुर्दशा केली, हेही मी दाखवून देतो. तामिळनाडूत मी द्रमुक आणि काँग्रेस यांची पोलखोल करतो. महाराष्ट्रात मी नकली शिवसेना, नकली राष्ट्रवादी आणि काँग्रेस यांच्यावर टीकेचे आसूड ओढतो.

**प्रश्न: विरोधी पक्ष आपल्यावर टीका करतो. महाराष्ट्रात सध्या अनेक पक्ष आहेत. मग तुमच्याच पक्षाला लोक का मतदान करतील असे वाटते?**

**उत्तर:** जनसामान्यांच्या आयुष्यात बदल घडेल अशा अनेक उपयोगी योजना आम्ही तयार केल्या आणि यशस्वीपणे राबवल्या. आयुष्मान भारत योजनेंतर्गत लोकांना मिळणारे मोफत उपचार, जनऔषधी अंतर्गत स्वस्त दरात मिळणारे औषध, पंतप्रधान आवास योजनेंतर्गत मिळालेली घरे, जल जीवन मिशन अंतर्गत लोकांना मिळणारे पिण्याचे स्वच्छ पाणी, पीएम किसान योजनेंतर्गत शेतकऱ्यांना मिळणारे थेट आर्थिक सहकार्य अशा कित्येक योजनांचा मला आणि माझ्या सरकारला उल्लेख करता येईल. हे आमचे कार्य आहे.

**प्रश्न: गेल्या वेळी महाराष्ट्राने आपल्याला ४१ जागा निवडून दिल्या होत्या. यावर्षी महाराष्ट्राकडून काय अपेक्षा आहे?**

**उत्तर:** एनडीएच्या विकासावर आधारित दृष्टिकोनाला महाराष्ट्राने कायमच साथ दिलेली आहे. मी त्यांच्या आशीर्वादासाठी अतिशय कृतज्ञ आहे. त्यांचा विश्वास सार्थ ठरविण्यासाठी आणि त्यांच्या उन्नतीसाठी आम्ही विविध उपक्रम हाती घेतले आहेत. लातूरला मराठवाडा रेल्वे कोच फॅक्टरी, बडनेरा येथे वॅगन दुरुस्ती आणि वंदे भारतमधील खुर्च्यांच्या देखभालीसाठी पुण्यात सुरू केलेले वर्कशॉप यामुळे अनेक नोकऱ्यांची निर्मिती झाली आहे. यामुळे देश देखील स्वयंपूर्ण झाला आहे. अटल सेतू सारखा महत्त्वाकांक्षी प्रकल्प आपण पूर्ण केला आणि आपले जगणे सुसह्य झाले हे लोकांना देखील जाणवले. महाविकास आघाडी आणि पूर्वी केंद्रात असलेल्या यूपीए सरकारच्या काळात झालेला भ्रष्टाचार महाराष्ट्रातील जनतेने पाहिला आहे. महाराष्ट्रातील लोकांना आता घोटाळे नको आहेत. त्यांना चांगल्या योजना हव्या आहेत. प्रसिद्धीसाठी काम करणारे लोक महाराष्ट्रातील जनतेला नको आहेत, जनहितार्थ योजना जनतेला हव्या आहेत. त्यामुळे यंदा महाराष्ट्रातील जनता गेल्यावेळपेक्षा मोठा विजय आम्हाला देईल.

**प्रश्न: एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्यामुळे महाराष्ट्रात जागावाटपात भाजपच्या वाट्याला कमी जागा आल्या. त्यामुळे निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक असलेले निष्ठावान भाजप कार्यकर्ते नाराज आहेत...**

**उत्तर:** एक लक्षात घ्या. घटक पक्षांना बरोबर घेऊन चालण्यावर भाजपाचा विश्वास आहे. आम्ही दीर्घकाळापासून आघाडीत आहोत त्यामुळेच भारतीय राजकारणाच्या इतिहासात 'एनडीए'चे एक वेगळे स्थान निर्माण झाले आहे. आमच्या मित्रपक्षांनाही आम्ही तितकेच मानाचे स्थान देतो. त्यांच्या आशा-आकांक्षांनाही प्रतिनिधित्व मिळावे, असे आम्हाला वाटते. त्यामुळेच त्यांना आघाडीत पुरेसे स्थान मिळेल, याची आम्ही सतत काळजी घेत असतो. आमच्या कार्यकर्त्यांना याची पुरेपूर जाणीव आहे. म्हणूनच आम्ही जेव्हा मित्रपक्षांशी जागावाटपाच्या चर्चेसाठी बसलो त्यावेळी देश आणि राज्य यांच्यासाठी नेमके काय हिताचे ठरेल, याचा सर्वप्रथम विचार केला. आमच्या महायुतीचे काम असेच चालते.

**एकनाथ शिंदे, अजित पवारांना उद्धव ठाकरे आणि शरद पवारांचे राजकारण पसंत नव्हते. मोदी सरकार विकासाच्या मार्गावर काम करीत असताना आपण त्याला विरोध न करता पाठिंबा द्यायला हवा, अशी भूमिका या दोघांनीही आपल्या पक्षात घेतली होती. मात्र पक्षाच्या प्रमुखांना ही भूमिका मान्य नसल्याने एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी आपआपल्या पक्षातून बाहेर पडत राष्ट्रीय लोकशाही आघाडीत सामील होण्याचा निर्णय घेतला.**

**प्रश्न: शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांचे म्हणणे आहे की, आमचे पक्ष ओरिजिनल आहेत.**

**उत्तर:** तुम्ही जेव्हा महाराष्ट्राकडे पहाल तेव्हा तुम्हाला एक गोष्ट स्पष्ट जाणवेल की, मूळची राष्ट्रवादी काँग्रेस आणि बाळासाहेबांची शिवसेना भाजपाबरोबर आहे. तरीही विरोधात असलेले राजकीय नेते विनाकारण जनतेच्या मनात गोंधळ निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. मात्र, आम्हाला पूर्ण विश्वास आहे की, या स्पष्ट रणनीतीमुळे आमचा राज्यातील स्ट्राइक रेट वाढेल. ज्या जागांवर आम्ही लढत आहोत त्यावर नक्कीच विजयी होऊन त्याचा फायदा महायुतीला होईल.

**प्रश्नः विरोधी पक्षांचे मत आहे की, तुमची महायुती अधिक काळ टिकणार नाही...**

**उत्तरः** केंद्रात २०१४ आणि २०१९ मध्ये आम्हाला स्पष्ट बहुमत असूनही आम्ही आमच्या मित्रपक्षांना सरकारमध्ये योग्य स्थान दिले. एक लक्षात घ्या, महाराष्ट्रात आम्ही सर्वात मोठा पक्ष असूनही मुख्यमंत्री शिवसेनेचा आहे. काँग्रेसचे मात्र तसे नसते. त्यांना आपल्या मित्रपक्षांना कमकुवत करायचे असते. आताही तुम्ही इंडी आघाडीकडे पाहिले तर काँग्रेसचे शहजादे केरळमध्ये त्यांच्या स्वतःच्या आघाडीतील घटक पक्षाविरोधात निवडणूक लढवत आहेत. त्यांचा पक्ष पश्चिम बंगालमध्ये त्यांच्याच आघाडीतील मित्रपक्षाशी लढत आहे, असे चित्र तुम्हाला दिसेल. एनडीए आणि इंडी आघाडीतील या फरकाची तुलना केली तर कोण सगळ्यांना बरोबर घेऊन जाते आणि स्थिर व मजबूत सरकारचा वायदा करते, हे तुमच्या सहजपणे लक्षात येईल.

**प्रश्नः लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात विकास हा मुद्दा होता. मात्र, अचानक असे काय घडले की हिंदू कार्ड, मंगळसूत्र आणि पाकिस्तान हे मुद्दे प्रचारात आणावे लागले?**

**उत्तरः** मी आधी म्हटल्याप्रमाणे तुम्ही माझ्या भाषणांचा बारकाईने अभ्यास केला तर आम्ही आमच्या सत्ताकाळात काय चांगले काम केले, हे सांगण्यावर माझा अधिक भर असतो, हे तुमच्या लक्षात येईल. मात्र, प्रसारमाध्यमांना इतर मुद्द्यांमध्ये अधिक रूची आहे. काँग्रेस आणि इंडी आघाडीची जी लक्तरे मी वेशीवर टांगतो त्यावर आधारलेले मथळे देण्यातच प्रसारमाध्यमांना अधिक आवडते. मला तुम्हालाच विचारावेसे वाटते. लोकांकडील संपत्तीचे सर्वेक्षण करून ज्याच्याकडे अधिक असेल ती काढून घेऊन इतरांना संपत्तीचे वितरण केले जाईल, असे काँग्रेसने आपल्या जाहीरनाम्यात म्हटले आहे. याबद्दल मी बोलायला हवे, हो की नाही? पाकिस्तान सरकारातील प्रभावी लोकांचा काँग्रेस पक्षाला पाठिंबा आहे, हे मी निदर्शनास आणून दिले पाहिजे की नको? काँग्रेसने जर संविधानाला बाजूला सारत धर्माच्या आधारावर आरक्षण दिले असेल तर त्यावर बोलायला हवे की नको?

## काँग्रेसचे शहजादे माओवाद्यांची भाषा बोलत आहेत

**प्रश्नः आपण काँग्रेसच्या जाहीरनाम्यावर जोरदार हल्ला का चढवला?**

**उत्तरः** तुम्ही काँग्रेसचा जाहीरनामा पाहिला आहे ना? त्यात अनेक घातक कल्पना मांडण्यात आल्या आहेत. तुम्हाला काँग्रेसच्या तुष्टीकरणाचा इतिहास ठावूकच आहे. काँग्रेसचे राजपुत्र कशी माओवाद्यांची भाषा बोलत आहेत, हेही तुम्ही पाहात आहात. त्यामुळे या सर्व मुद्द्यांकडे बोट दाखवणे, त्यातील उणिवा निदर्शनास आणून देणे, हे प्रसारमाध्यमांचे कर्तव्य नाही का?

**प्रश्नः विरोधी पक्ष केवळ आरक्षणाच्या मुद्द्यावरच तुम्हाला का धारेवर धरत आहेत?**

**उत्तरः** २०१४ नंतर सर्व भारतीयांना एक गोष्ट स्पष्टपणे जाणवली. आमच्या सबका साथ, सबका विकास या मंत्राने प्रत्येक समुदायाच्या प्रत्येकाला विकासाच्या मंचावर एकत्र आणले. आम्ही आमच्या सर्वसमावेशक दृष्टिकोनामुळे समर्पित भावनेने सर्वांची सेवा केली आहे. जी काँग्रेस आणि त्यांच्या मित्रांच्या भेदभावपूर्ण राजकारणाच्या कैक पटींनी विरोधाभासात्मक आहे. आपण लोकांमध्ये जातीपातीवरून दुही निर्माण करू शकत नाही, हे काँग्रेसला आता कळून चुकले आहे. त्यामुळेच त्यांनी आता आरक्षणाच्या मुद्द्यावरून लोकांच्या मनात भीती निर्माण करण्याचे काम चालवले आहे. उलट आरक्षणाच्या मुद्द्यावरून काँग्रेसनेच मोठे पाप केले आहे. त्यांनी ओबीसींचे आरक्षण ओरबाडून त्यांच्या व्होटबँकेला ते वाटून टाकले आहे.

**प्रश्नः तर, काँग्रेस आणि भाजपा यांच्या दृष्टिकोनातील नेमका फरक काय आहे?**

**उत्तरः** विरोधकांचा हेतू समजण्यासाठी तुम्हाला त्यांचे राजकारण समजून घ्यावे लागेल. २०१४ पूर्वी त्यांचे राजकारण लोकांमध्ये जातीपातीवरून भेद निर्माण करत काही धार्मिक व्होट बँक तयार करणे, यावर चालत होते. विकास हा मुद्दा त्यांच्या अजेंड्यावर कधीच नव्हता. त्यामुळेच स्वातंत्र्यानंतरच्या ६० वर्षांनंतरही आपल्या लोकांना विशेषतः अनुसूचित जाती, जमाती आणि इतर

मागासवर्गीयांना स्वच्छतागृहे, नळ जोडण्या आणि डोईवरील छप्पर या मूळ गोष्टींसाठी संघर्ष करावा लागत होता. लोकांना विकास हवा आहे. त्यांना अमूक पक्षाशीच बांधून राहणे फारसे रुचत नाही. जो पक्ष त्यांच्यासाठी काम करतो त्याच्या मागे जाण्यात लोकांना कमीपणा वाटत नाही. त्यामुळे साहजिकच लोक आमच्याकडे येतात. कारण भाजपाची विकासावर श्रद्धा आहे. आम्ही केवळ याच मुद्द्यावर लक्ष केंद्रित केले आहे. त्यामुळे आम्हाला समाजाच्या सर्व स्तरांतून पाठिंबा मिळत आहे. यापूर्वी काँग्रेस फक्त त्यांची मते मिळवायची. आमच्या या दृष्टिकोनामुळे आता काँग्रेस अस्वस्थ झाली आहे.

**प्रश्न: टीकेचे नेमके लक्ष्य कोण असते?**

**उत्तर:** संपूर्ण देशात एक पक्ष आणि त्या पक्षाचे कुकर्म सर्वत्र सारखेच असल्याचे तुमच्या निदर्शनास येईल. हा पक्ष म्हणजे काँग्रेस. देशापुढील सर्व समस्यांचे मूळ कारण काँग्रेसच आहे. तसेच देशाला मागास ठेवण्यासाठी ज्या काही शक्ती काम करत आहेत त्यांचे चुंबकीय क्षेत्रही काँग्रेसच्याच परिघात आहे, हेही तुमच्या निदर्शनास येईल.

**प्रश्न: या लोकसभा निवडणुकीत पुन्हा एकदा बहुमत प्राप्त करण्यासाठी आपली प्राथमिकता काय आहे. आपल्या अजेंड्यावरील पहिला मुद्दा काय आहे?**

**उत्तर:** आमचा अजेंडा अगदी सुस्पष्ट आहे आणि आम्ही अत्यंत स्पष्टपणे तो मांडत आहोत. विकसित भारताचे स्वप्न साकारण्याच्या दृष्टीने आवश्यक असलेला प्रत्येक प्रयत्न आम्ही करीत आहोत. याकरिता, आगामी पाच वर्षांचे नियोजन आम्ही केलेले आहे; तसेच नवीन सरकार स्थापन झाल्यानंतर पहिल्या १०० दिवसांत नेमके काय करायचे आहे त्याचीदेखील आम्ही योजना तयार केलेली आहे.

**प्रश्न: आपण '२०४७ चे व्हिजन', 'पहिले शंभर दिवस' याविषयी बोलता. आपल्या नेमके काय मनात आहे..?**

**उत्तर:** तुम्ही देखील व्यक्तिगत आयुष्यात निश्चित दृष्टी ठेवून काम करता ना... माझेही तसेच आहे. ज्यांनी माझी कार्यशैली जवळून पाहिलेली आहे त्यांना हे माहिती आहे की, आमचे सरकार स्थापन झाल्यानंतर पहिल्या १०० दिवसांत मी अत्यंत महत्त्वपूर्ण निर्णय घेतलेले आहेत; तसेच पुढील पाच वर्षांत त्याचा वेग व गती कायम राहील, यादृष्टीने रचना केलेली आहे. आता भारताला जगातील तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था म्हणून विकसित करण्याचे आमचे ध्येय आहे. त्यादृष्टीने आम्ही यापूर्वीच काम सुरू केले आहे. २०४७ साठी आम्ही जे विकसित भारताचे ध्येय निश्चित केले आहे त्याकरिता आम्ही २४ तास कार्यरत राहणार आहोत. प्रत्येक भारतीयाची आकांक्षापूर्ती करण्यासाठी मी प्रत्येक क्षण कार्यरत आहे.

**प्रश्न: २०४७ पर्यंत विकसित भारत ही आपली घोषणा राष्ट्रीय मुद्दा असेल का?**

**उत्तर:** आपण एक लक्षात घेतले पाहिजे की, २०४७ पर्यंत विकसित भारताची निर्मिती करणे हे एका व्यक्तीचे किंवा एका पक्षाचे काम नाही. भारताच्या लोकांनी हृदयापासून हे लक्ष्य गाठण्याचे आव्हान निश्चित केले आहे. गेल्या १० वर्षांत झालेल्या विकासकामांमुळेच आपला देश आता विकसित भारताचे स्वप्न पाहत आहे. २०१४ पूर्वीचा काळ आपण आठवून पाहा.

**प्रश्न: आपण २०४७ बद्दल बोलता पण गेल्या पाच वर्षांचे काय?**

**उत्तर:** २०१९ मध्ये जेव्हा आमचे सरकार स्थापन झाले त्यानंतर पहिल्या १०० दिवसांत आम्ही अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. जम्मू, काश्मीर व लडाख येथे लागू असलेले कलम ३७० हटवणे, 'यूएपीए'सारख्या कायद्यामध्ये सुधारणा करून दहशतवादविरोधी कायदा अधिक सक्षम करणे, ट्रिपल तलाकचे विधेयक मांडून त्याचे कायद्यात रूपांतर करणे, बँकांना सुस्थितीत आणण्यासाठी बँकांचे विलीनीकरण करणे, अनेक क्षेत्रामध्ये थेट परदेशी गुंतवणुकीसाठी आवश्यक त्या सुधारणा करणे, लहान गुंतवणूकदारांना फसविणाऱ्या योजनांना पायबंद घालण्यासाठी आणि त्यांच्यावर कडक कारवाई करण्यासाठी कठोर कायदा तयार करणे, शेतमालावरील किमान हमीभावात वाढ करणे, पीएम-किसान ही योजना केवळ लघू व अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी होती त्याची व्याप्ती वाढवत ती सर्व शेतकऱ्यांना लागू करणे, शेतकरी आणि व्यापाऱ्यांसाठी पेन्शन योजना लागू करणे, जल-शक्ती मंत्रालयाची स्थापना करणे असे अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी आम्ही केली आहे.

**प्रश्न: ...म्हणजे आपल्याला नेमके काय म्हणायचे आहे?**

**उत्तर:** 'यूपीए'प्रणित सरकारच्या दशकभराच्या कालावधीमध्ये देशातील शोषित-वंचित घटक, बँकिंग व्यवस्था आणि अर्थव्यवस्था यांच्या व्यवस्थापनात गलथानपणा होता. भ्रष्टाचार आणि धोरण लकव्यामुळे लोक वैतागले होते. त्यानंतर आम्ही केलेले काम लोकांसमोर आहे.

**प्रश्न: भाजपा सत्तेत आला तर संविधान बदलेल, हा विरोधकांचा प्रचार आहे. तुमच्यासह भाजपच्या अनेक वरिष्ठ नेत्यांनी प्रचारादरम्यान हा मुद्दा खोडून काढण्याचा प्रयत्न केला आहे. तरीही विरोधी पक्ष सातत्याने हा मुद्दा लावून धरत आहे. असे का?**

**उत्तर:** एक लक्षात घ्या मोदी आज जो कोणी आहे तो केवळ आणि केवळ बाबासाहेबांच्या घटनेमुळेच आहे. अशा सशक्त आणि सक्षमकारक संविधान व लोकशाहीशिवाय माझ्यासारखा सामान्य कार्यकर्ता पंतप्रधानपदापर्यंत पोहोचूच शकला नसता. हे सर्व आपल्या राज्यघटनेचे यश आहे. त्यामुळे तुम्ही तर्काच्या चष्म्यातून पाहिल्यास संविधानाच्या पावित्र्याचे आणि लोकशाहीचे रक्षण करणे, हे माझ्या स्वत:च्या हिताचे आहे, जे मी प्रामाणिकपणे करतो आहे. आपल्या संविधानाचे आणि लोकशाहीचे उल्लंघन कोणाच्या काळात अधिक झाले, याचा विचार केलाय का तुम्ही? काँग्रेसच्या कार्यकाळातच ही सर्व पापे अधिक प्रमाणात झाली आहेत. कोणताही विधिनिषेध न बाळगता सर्रास राज्य सरकारे बरखास्त करण्याचे काम काँग्रेसनेच सर्वाधिक वेळा केले आहे. काँग्रेसच्या इतिहासात अशी घटनेची पायमल्ली केलेली १०० उदाहरणे सापडतील. लोक काँग्रेसचा इतिहास विसरलेले नाहीत. त्यामुळे काँग्रेस किंवा इंडी आघाडीच्या प्रचारातील या प्रोपगंडावर कोणीही विश्वास ठेवायला तयार नाही.

**प्रश्न: एकीकडे भारत जगातील तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था होण्यास सज्ज आहे. त्याचवेळी देशात अजूनही ८० कोटी जनतेला मोफत धान्यपुरवठा केला जात आहे. हे अंतर कमी करण्यासाठी काय योजना आहे आपल्याकडे?**

**उत्तर:** संसदेत यावर मी सविस्तर निवेदन दिले आहे. पण, आपल्या वाचकांसाठी मी पुन्हा एकदा सांगतो. जगात आपण लवकरच तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था होणार आहोत. गेल्या १० वर्षांत २५ कोटी जनतेला आम्ही दारिद्र्याच्या खाईतून वर आणले आहे. गरिबी काय आहे, हे मी जवळून अनुभवले आहे. तुम्ही गरिबीतून वर आलात, पण काही सुरक्षा तुम्हाला नसेल तर नशिबाचा एक वळसा तुम्हाला पुन्हा गरिबीच्या खाईत लोटू शकतो. तुम्ही आमच्या कल्याणकारी योजना बारकाईने पाहिल्या तर गरिबीच्या खाईत कोणी पुन्हा लोटले जाऊ नये, अशा पद्धतीने त्यांची आखणी करण्यात आल्याचे तुमच्या लक्षात येईल. आयुष्मान भारत योजनेचेच उदाहरण घ्या. गरिबीतून वर आलेल्या कुटुंबाला काही तातडीची वैद्यकीय गरज लाभली तर त्यांना सर्वोत्तम वैद्यकीय उपचार मोफत मिळतील, याची हमी ही योजना देते. ही योजना केवळ जीवच वाचवते असे नव्हे तर त्या कुटुंबावर पडणारा आर्थिक भारही हलका करते. आता तर ही योजना ७० वर्षे वयावरील लोकांनाही लागू करण्यात आली आहे. त्यामुळे भविष्यात मध्यम वर्गातील कुटुंबांनाही योजनेचा लाभ होईल.

**प्रश्न: मोफत अन्नधान्य पुरवठा योजनेचा लोकांना लाभ होत आहे का?**

**उत्तर:** देशात कोणतीही गरीब व्यक्ती उपाशी राहू नये, यासाठी ही योजना आखण्यात आली आहे. जे गरीब आहेत त्यांच्यासाठी ही योजना वरदान आहे. ते भुकेले राहू नये यासाठी ही योजना आहे. त्याचवेळी ज्या लोकांनी दारिद्र्य अनुभवले आहे आणि जे दारिद्र्यरेषेतून वर आले आहेत त्यांना ही योजना अन्नसुरक्षा पुरवते. या लोकांना दारिद्र्य रेषा ओलांडून आणखी पुढे जाण्यासाठी मदतीचा हात हवा असतो. एक पक्के समर्थन हवे असते. मोफत अन्नधान्य पुरवठा योजना ही गरज पूर्ण करते.

भुकेल्या लोकांना त्यामुळे अन्न मिळते. देशात कोणताही गरीब भुकेला राहत नाही. घरातली चूल पेटती राहावी यासाठी पैसे देऊन धान्य खरेदी करण्याची गरज या योजनेमुळे थोडी कमी होते. याचा अर्थ असा की, केवळ पोटातली आग शमविण्यासाठी कर्ज काढण्याची गरज या योजनेमुळे राहत नाही. साहजिकच केवळ अन्नासाठी गरीब जनता कर्जाच्या जाळ्यात अडकत नाही, हे या योजनेचे मोठे यश आहे. जसजसा गरीब वर्ग मध्यम वर्गाकडे वाटचाल करत जाईल, तसतशी आपोआप या योजनेची मागणी कमी होत जाईल. ■

# मुस्लिमांनी आत्मपरीक्षण करावे...

## आपण कोणालाही सत्तेतून खाली खेचू शकतो, या भ्रमातून बाहेर पडा



मी आजवर तुम्हाला कधीच काही बोललो नव्हतो. मुस्लिम धर्मातील सुशिक्षितांनी आपल्या भावी पिढ्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी 'आत्मपरीक्षण' करण्याची नितांत आवश्यकता आहे. आपल्या मतांच्या जोरावर आपण कोणालाही सत्तेत बसवू शकतो किंवा सत्तेतून खाली खेचू शकतो, असा भ्रम देशातील मुस्लिमांनी बाळगू नये.

**आमच्या** मनात इस्लामबद्दल किंवा मुस्लिमांबद्दल द्वेषाची भावना नाही, हे लक्षात ठेवा. आमची ती संस्कृती नाही. आमच्या सरकारने देशातील सर्व जाती-धर्मांच्या नागरिकांसाठी 'कल्याणकारी योजना' सुरू केल्या आहेत. या योजनांचा लाभ मुस्लिम धर्मियांनाही मिळाला आहे. ५ लाखापर्यंतचे वैद्यकीय उपचार मोफत देणारी 'आयुष्मान भारत योजना' असो किंवा गोरगरिबांना आपल्या मालकीचे घर देणारी 'पंतप्रधान आवास योजना' असो, कोविडवरील लस असो अशा सर्व सरकारी योजनांचा, सुविधांचा लाभ सर्व धर्मियांना मिळाला आहे. तुम्ही मुस्लिम आहात म्हणून आमच्या सरकारने तुम्हाला हे लाभ दिले नाहीत, असे घडलेले नाही. काँग्रेसने देशावर दीर्घकाळ राज्य केले. या काळात तुम्हाला कोणत्या योजनांचा लाभ मिळाला आणि आमच्या सरकारच्या काळात तुम्हाला कोणत्या योजनांचा लाभ मिळाला याची तुलना तुम्हीच करा. आपल्या मतांच्या बळावर आपण एखाद्या पक्षाला सत्तेत आणू शकतो किंवा एखाद्या पक्षाला सत्तेतून बाहेर काढू शकतो, या विचारातून मुस्लिम समूदायाने बाहेर पडले पाहिजे. या विचाराने तुमच्या भावी पिढ्यांचे नुकसान होणार आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. लोकसभा निवडणुकीच्या प्रचारात मी काही वक्तव्य केल्यानंतर मी मुस्लिम धर्मियांच्या विरोधात आहे, असा प्रचार सुरू झाला. काँग्रेसने मुस्लिम धर्मियांच्या मनात सातत्यानी भीती निर्माण करण्याचे काम केले आहे. काँग्रेसने निर्माण केलेल्या भयगंडातून तुम्ही (मुस्लिम धर्मीय) बाहेर पडले पाहिजे. आपला देश वेगाने प्रगती करतो आहे. त्यात तुमचाही सहभाग असावा, अशी आमची इच्छा आहे. मोदी सरकारच्या सर्व योजनांचा लाभ तुम्हाला मिळाला आहे, हे तुम्हालाही ठाऊक आहे. मी जगभर प्रवास करतो तेव्हा अनेक देशातील मुस्लिमांनी योगासारख्या जीवनपद्धतीचा अंगीकार केल्याचे मला आढळून येते. मात्र आमच्या देशातील मुस्लिमांनी योगापासून दूर राहणे पसंत केले आहे. मुस्लिम धर्मियांनी आपल्या भविष्याचा विचार केला पाहिजे. माझ्या देशातील एखाद्या समुदायाने दहशतीच्या वातावरणात वेठबिगारासारखे राहावे, हे मला आवडणार नाही. मुस्लिमांच्या मनात काँग्रेसने भारतीय जनता पार्टीबद्दल अपप्रचारातून भीती निर्माण केली आहे. आमच्याबद्दल भीती निर्माण करत असताना काँग्रेसने मुस्लिम धर्मियांसाठी काहीच केले नाही. त्यांनी मुस्लिमांचा वापर फक्त मतांसाठी केला. मुस्लिमांना हळूहळू आपला वापर केला गेला हे कळू लागले आहे. ट्रिपल तलाकसारखी अमानवी प्रथा आमच्या सरकारने बंद केल्यावर अनेक मुस्लिम भगिनींनी आमच्या सरकारला धन्यवाद दिले.

**(पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अलिकडेच 'हिंदुस्थान टाइम्स' वृत्तपत्र समूहाला दिलेल्या मुलाखतीतील संपादित अंश.)**

# 400 जागांचे उद्दिष्ट साध्य करणार



मतदानाच्या पहिल्या तीन टप्प्यानंतर भारतीय जनता पार्टीला २८३ पैकी २०० जागा मिळतील, असा रागरंग दिसतो आहे. आमचे 'चारसौ पार' हे लक्ष्य निश्चित पूर्ण होईल, असा विश्वास केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी 'द इकॉनॉमिक टाइम्स' या ख्यातनाम वृत्तपत्राला दिलेल्या मुलाखतीत व्यक्त केला आहे. या मुलाखतीचा संपादित अंश.

**प्रश्न : तुमच्या मते भाजपाला कोणत्या राज्यात फायदा होईल, असे वाटते आहे?**

**उत्तर :** पंजाबमध्ये आमची कामगिरी मागच्या वेळा पेक्षा सुधारेल. आमच्या पंजाबमधील जागांतील वाढ कदाचित मोठी नसेल, परंतु आमच्या ताकदीच्या मानाने पंजाबमध्ये आम्ही नवी सुरूवात करणार आहोत. ईशान्येमधील आमचे संख्याबळ मागच्यावेळे इतकेच राहील. पश्चिम बंगाल, ओडिशा, आंध्र प्रदेश आणि तेलंगणामध्ये आमच्या कामगिरीत मोठी सुधारणा होईल. उत्तर प्रदेशमध्येही आमचे संख्याबळ मागील निवडणुकीपेक्षा वाढेल. तामिळनाडू

आणि केरळ या राज्यांमधील आमच्या मतांची टक्केवारी लक्षणीय प्रमाणात वाढेल. त्याखेरिज या दोन राज्यांमधील आमच्या जागाही वाढतील.

**प्रश्न : विरोधकांनी देशातील वाढत्या बेरोजगारीचा मुद्दा प्रचारात उचलला आहे. वाढत्या बेरोजगारीमुळे युवकांमध्ये असंतोष आहे, असेही विरोधक म्हणत आहेत. याबद्दल तुमचे म्हणणे काय आहे?**

**उत्तर :** बेरोजगारी वाढल्याबाबतची विरोधकांची टीका निखालस खोटी आहे. १३० कोटी लोकसंख्येच्या देशात रोजगारनिर्मिती, नोकऱ्या यासाठी वेगळ्या दृष्टीकोनातून विचार करावा लागतो. मोदी सरकारने बेरोजगारी कमी करण्यासाठी स्वयंरोजगारावर अधिक भर देत त्यादृष्टीने धोरणांची आखणी केली आहे. आजवर देशातील कोट्यवधी फेरीवाल्यांचा विचार सरकारी धोरणे आखताना झाला नव्हता. मोदी सरकारने या वर्गासाठी स्वनिधी योजना आणून त्यांना कोणत्याही तारणाशिवाय कर्ज देण्याची व्यवस्था केली. त्यामुळे हा वर्ग अर्थव्यवस्थेच्या मुख्य प्रवाहात आला. कोरोनासारख्या संकटात स्वनिधी योजनेमुळे फेरीवाले, छोटे विक्रेते-व्यापारी यांना मदतीचा हात मिळाला. सुमारे १ कोटी फेरीवाल्यांना स्वनिधी योजनेचा फायदा झाला आहे. युवकांच्या उद्यमशिलतेला चालना देण्यासाठी तसेच त्यांच्यातील बुद्धिमत्तेला अवकाश मिळवून देण्यासाठी 'स्टार्ट अप'ना उत्तेजन देण्याचे धोरण मोदी सरकारने प्रत्यक्षात आणले. उपलब्ध आकडेवारीनुसार देशात सध्या ८.२ लाख नोंदणीकृत स्टार्ट अप आहेत. याद्वारे सुमारे १५ लाख नोकऱ्या प्रत्यक्षरित्या उपलब्ध झाल्या आहेत. सरकारी आकडेवारीनुसार बेरोजगारीचा दर २०१७-१८ पासून सातत्याने घसरतो आहे. २०१७-१८ मध्ये बेरोजगारीचा दर ६.१ होता. तो आता २०२३ मध्ये ४.१ टक्क्यापर्यंत खाली आला आहे.

मोदी सरकारने पायाभूत सुविधा निर्मितीसाठी मोठा निधी उपलब्ध करून दिल्याने त्याद्वारे महामार्ग, द्रुतगती महामार्ग, मेट्रो अशा प्रकल्पांची कामे देशभर मोठ्या प्रमाणात सुरू आहेत. यातूनही मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती होत आहे. शेअर बाजारामध्ये निम्न मध्यम वर्गातील तरुण, गृहिणी गुंतवणूक करू लागले आहेत. गेल्या १० वर्षात शेअर बाजाराचा निर्देशांक सातत्याने वाढतो आहे. याचा फायदा या क्षेत्रात व्यवसाय करणाऱ्या अनेकांना झाला आहे. ही रोजगारनिर्मितीच आहे.

**प्रश्न : सरकारी नोकऱ्यांची संख्या कमी होत असताना देशातील बेरोजगारी कमी करण्यासाठी कोणत्या मार्गाने आपल्याला जावे लागेल?**

**उत्तर :** उत्पादन क्षेत्र, कृषि, सेवा या क्षेत्रात स्वयंरोजगाराच्या मोठ्या संधी सरकारी योजनांमुळे, सरकारी धोरणामुळे निर्माण झाल्या आहेत. या पुढील काळात या क्षेत्रातून निर्माण होणाऱ्या स्वयंरोजगारांच्या संधींना महत्व मिळणार आहे. या संधी आणखी कशा वाढतील, यासाठी मोदी सरकार प्रयत्नशील आहे. केवळ सरकारी नोकऱ्यांमधूनच बेरोजगारी कमी होईल, या परंपरागत विचारातून बाहेर पडत मोदी सरकारने धोरणे आखली आहेत, योजना प्रत्यक्षात आणल्या आहेत. त्याचा फायदा होत असल्याचे देशातील तरुणवर्ग अनुभवत आहे. त्यामुळे विरोधकांची टीका खोट्या माहितीवर आधारीत आहे. या अपप्रचाराकडे मतदार लक्ष देणार नाहीत.

**प्रश्न : पंतप्रधान मोदी यांनी काँग्रेसच्या जाहीरनाम्यावर टीका करताना ज्या मुद्यांचा आधार घेतला त्यामुळे प्रचाराला धार्मिक वळण लागले, अशी टीका होत आहे.**

**उत्तर :** काँग्रेसने आपल्या जाहीरनाम्यात धर्मावर आधारीत वैयक्तिक कायदे लागू करू, असे आश्वासन दिले आहे. आपला देश पंथनिरपेक्ष असताना काँग्रेससारखा अनेक वर्षे सत्तेत राहिलेला पक्ष धर्माच्या आधारावर कायदे आणण्याची भाषा करतो, तेव्हा त्यावर प्रचारात चर्चा होणे आवश्यक आहे. आपल्या संविधानाचा पाया कोणत्याही धर्मावर, पंथावर आधारीत नाही, असे असताना धर्मावर आधारीत कायदे लागू करू, असे आश्वासन देणे म्हणजे संविधानाशी प्रतारणा करण्यासारखेच आहे. आपला देश संविधानानुसार चालणार की नाही हा मुख्य मुद्दा असल्याने त्यावर चर्चा केलीच पाहिजे. आपल्या संविधानात धर्मावर आधारीत आरक्षण देण्यात आलेले नाही. असे असताना काँग्रेससारखा पक्ष धर्मानुसार आरक्षण देण्याची भाषा करत असेल तर निवडणुकीच्या प्रचारात जनतेसमोर हे मुद्दे ठेवलेच पाहिजे. काँग्रेसच्या आश्वासनाशी आम्ही कदापि सहमत होणार नाही. त्यामुळे जनतेपुढे या संदर्भातील आमची भूमिका प्रचारसभांतील भाषणातून मांडणे हे आमचे कर्तव्य आहे.

**प्रश्न : काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी जीएसटीच्या एकीकृत दराची कल्पना मांडली आहे. त्याबाबत आपण काय सांगू इच्छिता?**

**उत्तर :** याच राहुलबाबांनी काही वर्षापूर्वी 'जीएसटी'वर गब्बर सिंग टॅक्स अशा भाषेत टीका केली होती. आता तेच राहुलबाबा 'जीएसटी'च्या एकीकृत दराची भाषा करू लागले आहेत. याचा अर्थ तुम्हाला 'जीएसटी' मान्य आहे. यावर्षीच्या एप्रिल महिन्यात 'जीएसटी'द्वारे झालेले करसंकलन २ लाख १० हजार कोटी एवढे झाले आहे. 'जीएसटी'मुळे अप्रत्यक्ष करात कपात होऊन सामान्य माणसावरील कराचे ओझे कमी झाले. त्याचा परिणाम अनेक वस्तूंचे आणि सेवांचे दर कमी होण्यात झाला. पूर्वी देशात १६ प्रकारचे कर अस्तित्वात होते आणि त्यातून ६० हजार कोटी एवढे उत्पन्न सरकारला मिळायचे. आता हे उत्पन्न तिपटीपेक्षा अधिक झाले आहे. परिणामी महागाई कमी झाली आहे. एकीकृत दराची कल्पना मांडणाऱ्या राहुलबाबांना मला एक प्रश्न विचारायचा आहे तो म्हणजे अगरबत्या तयार करण्याच्या व्यवसायातून लाखो लोकांना रोजगार मिळाला आहे. मात्र हा उद्योग छोटा आहे. हा उद्योग करणाऱ्यांचे भांडवल कमी असते, गुंतवणूकही मर्यादित असते. अगरबत्ती उद्योग आणि वातानुकूलित यंत्रं विकणारा उद्योग यावरचा कर सारखा कसा असू शकतो? उदबत्तीवर ५ टक्के दराने कर आकारला जातो, वातानुकूलित यंत्रांवर २८ टक्के एवढा कर आहे. उदबत्ती तयार करणारे, विकणारे सामान्य माणसांपैकी आहेत. सामान्यातला सामान्य माणूसही उदबत्ती विकत घेतो. वातानुकूलित यंत्रं (एसी) खरेदी करण्याचे स्वप्नही सामान्य माणूस पाहू शकत नाही. उदबत्तीवरचा कर वाढवून तो 'एसी'च्या करा एवढा केला तर सामान्य माणसालाच त्याचा फटका बसेल. खतांवर ५ टक्के एवढा आहे तर सट्टा, गॅम्बलिंग यावर २८ टक्के कर आहे. राहुलबाबांचे म्हणणे मान्य केले तर गॅम्बलिंगवरचा ५ टक्के करावा लागेल. त्यांना असले सल्ले कोण देतो. हे पहावे लागेल.

**प्रश्न : नागरीकत्व सुधारणा कायद्या (सीएए)नुसार भारताचे नागरिकत्व मिळवण्यासाठी गृह मंत्रालयाकडे किती अर्ज आले आहेत?**

**उत्तर :** माझ्याकडे या क्षणाला किती अर्ज आले आहेत याची निश्चित आकडेवारी उपलब्ध नाही. दोन महिन्यांपूर्वी





नागरिकत्व सुधारणा कायद्याची (सीएए) अधिसूचना जारी झाल्यानंतर केंद्रीय गृह मंत्रालयाकडे २५ हजारांपेक्षा अधिक व्यक्तींनी भारताचे नागरिकत्व मिळण्यासाठी अर्ज केले आहेत. त्यांच्या अर्जांची छाननी आणि तपासणी चालू आहे.

**प्रश्न : मोदी सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळात कोणत्या आर्थिक सुधारणांना प्राधान्य दिले जाईल?**

**उत्तर :** काही वर्षापूर्वीपर्यंत भारताची अर्थव्यवस्था ७० कोटी लोकांपुरती मर्यादित होती. मात्र मोदी सरकारने ६० कोटी लोकांना जन-धन खाते उघडणे यासारख्या उपक्रमातून अर्थव्यवस्थेच्या मुख्य प्रवाहात आणले. याच वर्गाला मोदी सरकारकडून घर, स्वच्छता गृह बांधण्यासाठी अर्थसहाय्य दिले गेले. मोफत गॅस पुरविला गेला. गेल्या ४ वर्षापासून या वर्गाला आमच्या सरकारने मोफत अन्न-धान्य ही देण्यास सुरूवात केली आहे. मोदी सरकारने गेल्या १० वर्षात पायाभूत सुविधा क्षेत्रावर लक्ष केंद्रीत करत १० लाख कोटीहूनही अधिक रक्कम त्यासाठी खर्च केली आहे. याचे परिणाम देशाची अर्थव्यवस्था हळूहळू दृढ होण्यात झाला आहे. अर्थव्यस्थेत ज्या काही सुधारणा करायच्या बाकी आहेत त्या सुधारणा पुन्हा सत्तेत आल्यानंतर लगेचच हाती घेण्यात येतील. ■

# मोदी सरकारच्या कामगिरीवरच मतदारांपुढे गेलो आहोत

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी अलिकडेच 'इंडियन एक्सप्रेस'च्या लिज मॅच्यु, अमृता नायक दत्ता, पी.वैद्यनाथन अय्यर यांना दिलेल्या मुलाखतीचा संपादीत अंश. ही मुलाखत घेतली गेली तेव्हा राजनाथ सिंह यांनी १३ राज्यांमध्ये दौरा करून ५४ मतदारसंघात प्रचार केला. ५१ जाहीरसभा, ५ रोड-शो असा त्यांचा प्रचारातील सहभाग होता.



**प्रश्न : आपण निवडणुकीच्या बरोबर मध्यावर आहोत. ही निवडणूक कोणत्या विषयावर प्रामुख्याने लढली गेली, असे तुम्हाला वाटते?**

**उत्तर :** या निवडणुकीत मी मोदी सरकारच्या गेल्या १० वर्षाच्या कामगिरीवरच प्रचारसभांमध्ये भाष्य केले. मोदी सरकारमुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताची प्रतिमा कशी उज्वल झाली आहे, या विषयीही मी बोलत होतो. मोदी सरकारच्या कल्याणकारी योजनांची माहितीही मी दिली. सामान्य माणसाला मोदी सरकारच्या योजनाविषयी माहिती आहे, असे मला आढळून आले. त्याचबरोबर गेल्या १० वर्षात मोदी सरकारमुळे देशात झालेले बदल, देशाची उंचाललेली प्रतिमा याची माहिती ही सामान्य मतदाराला असल्याचे मला आढळले.

**प्रश्न : पहिल्या दोन टप्प्यात अपेक्षापेक्षा खूपच कमी मतदान झाल्याचे दिसले. एवढे मतदान कमी होऊन तुम्ही 'अब की बार ३७० पार' या भाजपाच्या घोषणावर ठाम आहात का?**

**उत्तर :** तुम्ही म्हणता तेवढे मतदान कमी झालेले नाही. निवडणूक आयोगाच्या अधिकृत आकडेवारीनुसार ६६-६७ टक्के मतदान दोन टप्प्यात झाले आहे. इंडी आघाडीला आपल्या समर्थकांना मतदानाला प्रवृत्त करण्यास यश आले नसल्यामुळे मतदानाची टक्केवारी थोडी कमी झाली असेल. आपल्या मतांमुळे काहीच फरक पडणार नाही. अशी भावना इंडी आघाडीच्या समर्थकांमध्ये असल्यामुळे ती मंडळी मतदानालाच बाहेर पडली नसावी. इंडी आघाडीच्या नेत्याकडे मोदी सरकारच्या कामगिरीबद्दल बोलण्यासाठी काही मुद्दे नसल्यामुळे घटना बदलली जाणार असल्याचा निखालस खोटा प्रचार विरोधी आघाडीने सुरू केला. काँग्रेसने सत्ता काळात ८५ वेळा घटनेत बदल केले. तरीही घटना बदलाचा खोटा प्रचार काँग्रेसकडून सुरू झाला. घटनेचा अनादर करून काँग्रेसने देशावर आणीबाणी लादली. संविधानाचा असा अपमान करणाऱ्या काँग्रेसच्या नेतेमंडळींनी आमच्याविरुद्ध असा प्रचार करावा हा मोठा विनोद आहे. आणीबाणीत विरोधी पक्षाच्या अनेक कार्यकर्त्यांना, सामान्य नागरिकांना विना चौकशी अनेक महीने तुरुंगात डांबले गेले. मी त्यावेळी १८ महीने तुरुंगात काढले. माझ्या आईचे निधन झाले तरी मला पॅरोलवर सोडले नव्हते. काँग्रेसला आपला मोठा

## मुस्लिम धर्मियांच्या मनात भाजपाबद्दल विष पेरण्याचे पद्धतशीर प्रयत्न

**अनेक वर्षांपासून मुस्लिम आणि अन्य अल्पसंख्यकांच्या मनात भारतीय जनता पार्टीबद्दल विष पेरण्याचे काम काँग्रेससह अनेक विरोधी पक्ष सातत्याने करत आहेत. मुस्लिमांना भाजपाची भीति दाखवून त्यांची मते एकगठ्ठा आपल्यालाच मिळण्यासाठी भाजपाबद्दलचा अपप्रचार चालू असतो. मोदी सरकारने आपल्या १० वर्षांच्या कार्यकाळात मुस्लिम व अन्य अल्पसंख्यकांवर अन्याय केल्याचे एकही उदाहरण विरोधक दाखवू शकत नाहीत.**

पराभव होणार हे ठाऊक झाल्यानेच मतदाराच्या मनात संभ्रम पसवण्यासाठी काँग्रेसकडून घटना बदलाच्या अफवा पसरवण्यात आल्या.

**प्रश्न : इंदुरमध्ये काँग्रेसच्या उमेदवाराने भारतीय जनता पार्टीत प्रवेश केला. यासाठी भाजपाने सत्तेचा दुरूपयोग केल्याचे आरोप होत आहेत. याबद्दल आपण काय म्हणाल?**

**उत्तर:** भारतीय जनता पार्टीने काँग्रेसच्या उमेदवाराशी भाजपा प्रवेशासाठी कधीच संपर्क साधला नव्हता. मुळात तुम्ही अशा माणसाला उमेदवारी का दिली? समजा एखादा उमेदवार आमच्याकडे आला आणि त्याने आम्हाला पाठिंबा देण्याची तयारी दर्शविली तर आम्ही त्याला नाही म्हणावे अशी तुमची अपेक्षा आहे का? भाजपाविरुद्ध लढून आपण जिंकू शकणार नाही, हे लक्षात आल्याने कदाचित त्या उमेदवाराने भारतीय जनता पार्टीला पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला असल्याची शक्यता आहे. तुम्ही त्या पक्षाच्या नेत्याला आणि उमेदवाराला हा प्रश्न विचारायला हवा. त्यांना प्रश्न विचारायचे सोडून तुम्ही आमच्यावर आरोप करत आहात. आपला उमेदवार पक्षातच राहावा, त्याने निवडणुकीच्या रिंगणातून माघार घेऊ नये, हे पाहण्याची जबाबदारी संबंधित पक्षाची आहे. तुम्हाला तुमचा उमेदवार सांभाळता येत नसेल तर ते तुमचे अपयश आहे.

**प्रश्न : प्रचार मोहिमेत मुस्लिम धर्मियाविरोधात प्रचार होत आहे. त्याबाबत तुमचे मत काय आहे.**

**उत्तर :** भारतीय जनता पार्टीचे सरकार अल्पसंख्यकांच्या विरोधात आहे असे दाखवणारे एकतरी उदाहरण तुम्ही दाखवा. सरकारच्या कल्याणकारी योजनांमध्ये सर्व जाती धर्मांच्या नागरिकांना लाभ झाला आहे. कोणत्याही कल्याणकारी योजनांतून मुस्लिम नागरिकांना वगळण्यात आलेले नाही. सर्व भारतीय नागरिकांना सरकारी योजनांचे लाभ समान पद्धतीने मिळत आहेत.

**प्रश्न : काही धर्मियांच्या विरोधात तुमच्या पक्षाच्या नेत्यांकडून सातत्याने विधाने केली जात आहेत. त्याचे काय?**

**उत्तर :** भारतीय जनता पार्टीबद्दल अल्पसंख्यकांमध्ये गैरसमज निर्माण करण्याचे प्रयत्न आमच्या विरोधकांकडून नेहमीच होत असतात. आम्हाला अल्पसंख्यकांच्या मनात आमच्या पक्षाबद्दल, सरकारबद्दल विश्वास निर्माण करावयाचा आहे. अल्पसंख्याकांच्या मतवार डोळा ठेवून काही विरोधी पक्ष अल्पसंख्यकांच्या मनात भारतीय जनता पार्टीबद्दल भीती निर्माण करण्याचे काम पद्धतशीरपणे करत आहे. नागरिकत्व सुधारणा कायद्याचे (सीएए) उदाहरण घ्या. या कायद्याचा भारतातील मुस्लिमांशी काही संबंध नाही. तरीही या कायद्यामुळे तुमचे नागरिकत्व जाणार असे सांगून मुस्लिम धर्मियांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न भारतीय जनता पार्टीच्या विरोधकांकडून होत आहे. भारतीय जनता पार्टीचा ,'वसुधैव कुटुंबकम' या तत्वावर पूर्ण विश्वास आहे. आपल्या राजकीय अस्त्विासाठी विरोधी पक्षाकडून मुस्लिम धर्मियांच्या मनात भारतीय जनता पार्टीबद्दल विष पेरण्याचे काम होत आहे. देशामध्ये धर्माच्या आधारावर विभाजन घडवून आणण्याचा विरोधी पक्षीयांचा प्रयत्न आहे. अल्पसंख्याक नागरिक विरोधकांच्या या अपप्रचारावर विश्वास ठेवणार नाहीत, असे मला ठामपणे वाटते. भारतात राहणाऱ्या सर्व नागरिकांना समान हक्क आणि अधिकार आहेत, यावर आमचा विश्वास आहे. अल्पसंख्यकांमधील शोषित, वंचित, मागासवर्गीयांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न आमच्या सरकारने गेल्या १० वर्षात केला आहे.

**प्रश्न : विरोधी पक्षांमध्ये फूट पाडून भारतीय जनता पार्टी राजकारणात अनैतिकता आणत आहे, असा आरोप सातत्याने होतो आहे. त्याबद्दल तुमचे मत काय आहे?**

**काँग्रेसने जाहीरनाम्यात जनतेच्या मालमत्तेचे सर्वेक्षण करण्याचा उल्लेख केला आहे. सामान्य माणसाला हे समजवून सांगण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोप्या भाषेत महिलांच्या मंगळसूत्राचा उल्लेख केला. नागरिकांकडे किती पैसे, सोने-नाणे आहे याचीच पाहणी करण्याची काँग्रेसची इच्छा आहे.**

**उत्तर :** विरोधी पक्षामध्ये फूट पडली तर त्याचा दोष भारतीय जनता पार्टीच्या नेतृत्वाला का दिला जातो? ज्या पक्षांमध्ये फूट पडली त्या पक्षाच्या नेत्यांमध्ये विचारसरणी, धोरणे यावरून मतभेद होते. या कारणांममुळे या पक्षामध्ये उभी फूट पडली आहे. त्याचे खापर भारतीय जनता पार्टीच्या माथ्यावर कोणी फोडू नये. आपले पक्ष का फुटले याचा विचार त्या पक्षाच्या नेत्यांनी करायला हवा. त्यासाठी या मंडळींनी आत्मपरिक्षण करायला हवे.

**प्रश्न : अंमलबजावणी संचालनालय (ईडी), केंद्रीय गुप्तचर विभाग (सीबीआय), आयकर विभाग (इन्कम टॅक्स) या केंद्र सरकारच्या यंत्रणांचा वापर करून विरोधी नेत्यांना धमकावले जात असल्याचा आरोपही केला जात आहे.**

**उत्तर :** या यंत्रणा आमच्या सरकारने निर्माण केलेल्या नाहीत. या यंत्रणांना काँग्रेस सत्तेत असताना स्वतंत्र पद्धतीने, कार्यक्षमतेने काम करू दिले जात नव्हते. आमच्या सरकारने या यंत्रणांना मोकळेपणाने काम करण्याची परवानगी दिली. यूपीए सरकारच्या १० वर्षांच्या काळात ईडीने अवैधरित्या जमा केलेली ५ हजार कोटींची मालमत्ता जप्त केली. भारतीय जनता पार्टीच्या सरकारच्या काळात गेल्या १० वर्षात १.२ लाख कोटींची मालमत्ता जप्त करण्यात आली. अवैध पद्धतीने संपत्ती गोळा करणाऱ्या लोकांवर ईडीने कारवाई केली. सरकारी नियम आणि कायद्यांविरोधात काम करणाऱ्यांवर कारवाईचा बडगा उगारला, ही ईडीची चूक झाली असे तुम्हाला म्हणायचे आहे का? फक्त विरोधी पक्षाच्या नेत्यांवर कारवाई होते असे म्हणणे चूक आहे. ज्यांनी कोणी बेकायदा आर्थिक व्यवहार केले आहेत त्यांच्याविरूद्ध अंमलबजावणी संचालनालय आणि आयकर विभाग कारवाई करत आहेत. विरोधी पक्षाच्या नेत्यांना आपल्या विरुद्धची कारवाई चूक आहे, असे वाटत असेल तर त्यांना त्याविरोधात न्यायालयात जाण्याचा मार्ग मोकळा आहे. कारवाई झालेल्या अनेक नेत्यांनी न्यायालयात दाद मागितली आहे. मात्र न्यायालयाकडून या नेत्यांना दिलासा मिळू शकलेला नाही, हे लक्षात घेणे महत्वाचे आहे. कारवाई झालेल्या नेत्यांविरोधात ठोस पुरावे आहेत. त्यामुळेच न्यायालयाकडूनही त्यांना दिलासा मिळालेला नाही, हे लक्षात घ्यावे लागेल.

**प्रश्न : अशोक चव्हाण, अजित पवार यासारख्या नेत्यांवर तुमच्या पक्षाने पूर्वी आरोप केले होते. आता हेच नेते तुमच्या पक्षात आले आहेत. त्यांच्यावरच्या आरोपांचे काय?**

**उत्तर :** ज्यांच्या विरुद्ध केंद्रीय तपास यंत्रणांच्या चौकशा सुरू आहेत त्या चालूच राहतील. तपास यंत्रणांना त्यांच्या पद्धतीने काम करण्याचे स्वातंत्र्य आमच्या सरकारने दिले आहे. चौकशा सुरू असलेले जे नेते आमच्या पक्षात आले आहेत, ते चौकशीत दोषी आढळले तर त्यांना त्याची किंमत चुकवावी लागेल. आमच्या सरकारने कोणत्याही यंत्रणेवर यासाठी दबाव आणलेला नाही.

**प्रश्न : मोदी सरकारमध्ये तुम्ही गृहमंत्री, संरक्षण मंत्री अशी महत्वाची खाती सांभाळली आहेत. मोदी सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळात तुम्हाला कोणत्या जबाबदारीची अपेक्षा आहे?**

**उत्तर :** याबाबतचा निर्णय पक्षाध्यक्ष आणि पंतप्रधान घेतील. पक्षाचा आदेश पाळणे हे माझे कर्तव्य आहे. पक्ष सांगेल ती जबाबदारी मी पार पाडेन.

**प्रश्न : मोदी सरकारच्या अग्निवीर योजनेविषयी अनेक शंका व्यक्त केल्या जात आहेत. संरक्षण मंत्री या नात्याने तुम्ही याविषयी काय सांगाल?**

**उत्तर :** ही योजना नुकतीच सुरू झाली आहे. याचे परिणाम कळण्यासाठी थोडा कालावधी लागेल. अग्निवीरमध्ये भरती झालेल्या तरुणांना ४ वर्षे सेवा केल्यानंतर समुरे ११ लाख रुपये वयाच्या २२-२३ व्या वर्षी मिळणार आहेत. याखेरिज निमलष्करी दलांमध्ये त्यांना नोकरीस प्राधान्य दिले जाईल. या योजनेत तरुणांच्या दृष्टीने काही हानीकारक असेल तर त्यात जरूर बदल केला जाईल. ■

# मोदींच्या मागे महाराष्ट्रातील 'डिअर'ची पॉवर

● चंद्रशेखर बावनकुळे, प्रदेश अध्यक्ष

देशातील जवळपास सर्वच राज्यांमध्ये देशाचे कणखर नेतृत्व असलेले पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पाठीमागे मोठी ताकद उभी राहतानाचे चित्र आहे. महाराष्ट्रातही यापेक्षा वेगळे चित्र नाही. या ठिकाणी देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे, अजित पवार आणि राज ठाकरे अर्थात 'डिअर' (DEAR)ची सामूहिक ताकद उभी आहे. त्यामुळे आम्ही अपेक्षेपेक्षा जास्त लोकसभेच्या जागांवर विजय मिळवला तर नवल वाटू नये, असा विश्वास भाजपा प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला आहे. पुण्याच्या दौऱ्यात श्री. बावनकुळे यांनी दै. 'पुण्यनगरी'शी विशेष संवाद साधत लोकसभेच्या विजयाची गणिते मांडली.



**देशात पुन्हा मोदी सरकार येईल?**

**बावनकुळे :** देशात आज सक्षम नेतृत्वाची गरज आहे. जागतिक पातळीवर भारताची महासत्ता म्हणून प्रतिमा मागील दहा वर्षांमध्ये तयार झाली आहे. जगातील अनेक देशांमधील नेतृत्व आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे चाहते आहेत. अमेरिका, चीन, जपान या देशांमध्येही आज मोदींचा करिश्मा आहे, ही एक भारतीय नागरिक म्हणून आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे. त्यामुळेच २०२४ मध्ये आयेगा तो मोदी' ही काळ्या दगडावरची रेघ आहे. त्यातूनच भाजपनेही 'अब की बार चारशे पार'चा नारा दिला आहे. त्याला निश्चितच मतदार साथ देतील.

**विरोधी 'इंडिया' आघाडीचे किती आव्हान आहे?**

**बावनकुळे :** सत्तेची खुर्ची मिळावी, या एकाच हेतूने 'इंडिया' आघाडीची स्थापना झाल्याचे दिसून येते. देशातील प्रमुख म्हटला जाणारा आणि आमच्या दृष्टीने संपलेला काँग्रेस पक्ष आज आम्हाला चॅलेंज करत आहे. ज्यांच्याकडे तीनशे उमेदवार नाहीत असा काँग्रेस आम्हाला चॅलेंज करतोय हे देशातील जनतेला कळत नाही का? आणि दुसरे, काँग्रेससोबत जे काही मित्रपक्ष आहेत ते फक्त आपले अस्तित्व टिकवण्यासाठी प्रयत्न करत आहेत. जवळपास २४ हून अधिक पक्ष एकत्र आले आहेत. त्यांच्यामध्ये देशाच्या विकासाचे काय व्हिजन आहे, हे तुम्हीच मला दाखवा. फक्त वैयक्तिक मोदी विरोध हे कितपत योग्य आहे? त्यामुळे मला तरी देशभरात विरोधी इंडिया आघाडीचे कुठेही अस्तित्व दिसून येत नाही.

**महाराष्ट्रात आपण फिरलात, काय स्थिती आहे?**

**बावनकुळे :** महाराष्ट्रातील प्रत्येक विधानसभा आणि लोकसभा मतदारसंघात प्रदेशाध्यक्षपदाचा पदभार स्वीकारल्यापासून माझे दोन-दोन दौरे झाले आहेत. प्रत्येक ठिकाणी भाजपचे पक्ष संघटन स्ट्राँग आहे. प्रत्येक सदस्य निःस्वार्थीपणे देशाचे नेतृत्व नरेंद्र मोदी यांच्या पाठीशी ठाम असल्याचे आपल्याला दौऱ्यातून जाणवले. त्यामुळे महाराष्ट्रात भाजपाला पोषक असे वातावरण आहे.

**हे झाले भाजपाचे, महायुतीची काय स्थिती आहे?**

**बावनकुळे :** जसे भाजपचे पक्ष संघटन स्ट्राँग आहे, तसेच महायुतीचा घटक पक्ष असलेल्या एकनाथ शिंदे यांच्या पाठीमागे निष्ठावान शिवसैनिकांची फौज आहे. जे बाळासाहेब ठाकरे, धर्मवीर आनंद दिघे यांचे विचार मानतात, ते सगळे शिवसैनिक शिंदे यांच्या पाठीशी आहेत. हीच स्थिती राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये आहे. अजित पवार यांनी आजपर्यंत कार्यकर्ते, लोकप्रतिनिधी, पदाधिकारी यांना जी ताकद दिली, ते सगळे त्यांच्यासोबत असताना दिसून येत आहेत. शिंदे, पवार यांच्याबरोबरच महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनीही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याच नेतृत्वाला साथ देण्यासाठी राज्यातील महायुतीला साथ दिली आहे. त्यामुळे महायुती भक्कमपणे उभी असून, प्रत्येक लोकसभेची जागा जिंकून आणण्यासाठी एकसंधपणे आम्ही प्रयत्न करत आहोत.

**चौकशा, घोटाळे दडपण्यासाठी अनेक नेते भाजपामध्ये येत आहेत?**

**बावनकुळे :** हे साफ चुकीचे आहे. देशात आणि राज्यात आमचे सरकार आहे. लोकांची जनभावना सध्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पाठीशी आहे. अनेकांना वाटते की, मोदी यांच्या शासनकाळात अनेक विकासाची कामे झाली. येणाऱ्या काळातही जनसामान्यांचा विकास करायचा असेल, तर मोदी यांच्याशिवाय पर्याय नाही. त्यामुळे विनाअट अनेक नेते भाजपामध्ये प्रवेश करताना दिसत आहेत. त्यामुळे चौकशा घोटाळे दडपण्यासाठी नेते भाजपमध्ये येत आहेत असे जर कोणी म्हणत असेल तर ते साफ चुकीचे आहे.

**लोकसभेच्या ४८ पैकी २४ जागांचे मतदान झाले, काय स्थिती आहे?**

## दिवसभराचा क्रम कसा असतो?

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या गत दहा वर्षांच्या काळात विकसित भारत' ही संकल्पना पुढे आली. या संकल्पनेला ज्या योजनांनी मूर्तरूप दिले, त्या योजना तळागाळात विशेषत: भाजप कार्यकर्त्यांपर्यंत पोहोचवणे हा माझा दिवसभरातील कामातील हा माझा पहिला क्रम. त्यानंतर माझा कार्यकर्ता जो पक्षासाठी जीव तोडून काम करत असतो, त्याच्या सुख-दु:खात सहभागी होणे आणि त्याला बळ देणे. सकाळी सात ते मध्यरात्री दोन वाजेपर्यंत माझे शेड्यूल ठरलेले असते. त्यामध्ये बूथवर जास्त लक्ष देतो. आमचे नेते देवेंद्र फडणवीस यांचे भक्कम पाठवळ आणि केंद्रीय नेतृत्वाची साथ या जोरावर आम्ही महाराष्ट्रात ऐतिहासिक विजय संपादन करू, असा मला विश्वास आहे.**

**बाबनकुळे :** मी वर म्हटल्याप्रमाणे आज राज्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पाठीमागे 'डिअर' (DEAR) अर्थात देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे, अजित पवार, राज ठाकरे यांच्याप्रमाणेच आरपीआय आणि इतर छोट्या पक्षांची भक्कम ताकद उभी आहे. त्यामुळे पहिल्या दोन टप्प्यांचा विचार करता जे टार्गेट ठेवले आहे, तेवढे सहजपणे पार करू. काही ठिकाणी कांटे की टक्कर दिसून येते, मात्र शेवटी विजय आमचाच होईल, हे तुम्ही लिहून घ्या.

**महाराष्ट्रात एकूणात काय परिस्थिती राहील?**

**बावनकुळे :** पहिल्या आणि दुसऱ्या टप्प्यात जे काही मतदान झाले, त्याचा विचार आणि अभ्यास केल्यानंतर आम्ही दावा करू शकतो कौ, जवळपास अपवाद वगळता सर्वच जागांवर आम्ही विजय संपादन करू. तिसऱ्या टप्प्यातदेखील पुणे, शिरूर, बीड, छत्रपती संभाजीनगर, नगरसह जवळपास सर्वच जागांवर आम्ही विजयाच्या दिशेने वाटचाल करत आहोत. मुंबईतही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेच्या उमेदवारांना मतदारांचा चांगला पाठिंबा मिळत आहे. त्यामुळे महाराष्ट्रात ज्या ४८ जागा आहेत, त्यातील किमान ४५ प्लस जागांवर आम्ही विजयी झाल्याचे तुम्हाला ४ जूनच्या निकालातून दिसून येईल. त्यामुळे तूर्त तरी 'वेट अण्ड वॉच...' ■

# देशहिताला सर्वोच्च प्राधान्य

● एस. जयशंकर, परराष्ट्रमंत्री

> आपण विशेषत: २०१४ पासून परराष्ट्र धोरणावर विशेष लक्ष केंद्रित केले आहे. त्यामुळे 'भारत प्रथम' ही ठाम जाणीव आपल्या प्रत्येक कृतीमध्ये प्रतिबिंबित झालेली दिसते. त्याचे पडसाद आपल्या परराष्ट्र धोरणात स्पष्ट दिसून येतात.

**येत्या** २५ वर्षांत 'विकसित भारत' घडवण्याच्या ध्येयापर्यंत पोहोचण्यासाठी आपल्याला बरेच काही हवे आहे. सर्वात पहिली गरज म्हणजे देशाच्या भवितव्याबद्दलचा द्रष्टेपणा आणि तितक्याच प्रमाणात, हे भवितव्य प्रत्यक्षात साकार करण्याच्या क्षमतेचे कर्तेपणा. हे दोन्ही आपल्याकडे आहे, असा आत्मविश्वास येण्यासाठी काहीएक सातत्यपूर्ण अनुभवाची प्रचीती हवी. दृढतेने प्रगती साधताना सुधारणांमध्ये सातत्य ठेवण्यासाठी राजकीय स्थैर्याच्या वातावरणाचीही गरज असते. दीर्घकालीन धोरण-संकल्पांची आखणी आणि अंमलबजावणी करता यावी, यासाठी असे राजकीय स्थैर्य ही पूर्वअट ठरते. देशांतर्गत राजकीय वातावरण कसे असेल, हे येत्या काही आठवड्यांमध्ये भारताचे लोक आपला राजकीय निवडीचा हक्क कसा बजावतात यावर बऱ्याच प्रमाणात अवलंबून आहे. पण विकसित भारतापुढे आंतरराष्ट्रीय वातावरणातूनही काही संधी आणि काही आव्हाने येणारच आहेत, हा मुद्दा महत्त्वाचा असल्याने त्याची चर्चा येथे करणे इष्ट ठरेल.

आदर्श स्थिती अशी की, सर्वच देशांनी आपापला राष्ट्रीय विकास वृद्धिंगत करण्यासाठी जगाचा लाभ आपल्याला कसा होईल, या दृष्टीने आपापले परराष्ट्र धोरण आखावे. अन्य देशांतील साधनसंपत्ती अथवा बाजारपेठा, तेथील तंत्रज्ञान अथवा व्यवस्थापन पद्धती यांचा लाभ आपल्याला व्हावा, असे लक्ष्य बहुतेकदा यामागे असते. ज्यांनी गेल्या अनेक दशकांमध्ये लक्षणीय प्रगती साध्य




केली, अशा देशांकडे याबाबत अधिक स्पष्टता असते. आपल्या बाबतीत असे दिसते की, २०१४ पासून परराष्ट्र धोरणाकडे आपण लक्ष केंद्रित केलेले आहेच, पण स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या पहिल्या चार दशकांत तत्त्वाग्रहांमुळे आपले धोरणही धूसर राहिले होते. काही परदेशी कल्पनांच्या आहारी जाऊन आपण काही वेळा इतरांच्या लाभासाठी आपली ध्येये दुय्यम मानली. त्याऐवजी सध्या दिसून येणारा मोठा बदल म्हणजे 'भारत प्रथम' ही ठाम जाणीव. पुढला मार्ग कसा असेल, कसा असावा हा विचार आज आपण जितक्या आत्मविश्वासाने करतो, तितकाच कोणताही निर्णय घेण्यासाठी राष्ट्रीय हित ही प्राथमिक कसोटी मानतो. यामुळेच आपल्या राजनया परराष्ट्र धोरणाला बहु-सन्मुखता येण्यास मदत झाली आहे आणि या बहु-सन्मुखतेमुळे आपल्याला अधिकाधिक सहयोगी वा भागीदार मिळवून आपल्यापुढील प्रश्न कमी करता येणार आहेत. भूमिका घेण्याचा प्रसंग येतो, तेव्हा आपण कचरत नाही, दबावाखाली येत नाही. मात्र त्याच वेळी, आपल्या संबद्धतेचे (अनेक देशांशी, अनेक परींच्या संबंधांचे) प्रतिपादनही आपण सातत्याने करत असतो. हा आजचा 'विश्वबंधू भारत' आहे.

भारताला नेतृत्वशक्ती म्हणून विकसित व्हायचे असेल, तर देशाने सखोल असे अशी राष्ट्रीय सामर्थ्य विकसित केली पाहिजेत. यापैकी मोठा भाग हा उत्पादक उद्योगांच्या वाढीतून साध्य होईल, कारण तंत्रज्ञानाचा तो पाया ठरतो. याबाबतीत भूतकाळात झालेल्या दुर्लक्षावर मात करण्यासाठी, आपण मोठ्या उडीचीच तयारी करणे

आवश्यक ठरलेले आहे. विशेषत: काही कळीच्या आणि नव्या पण भविष्यात उपयुक्त अशा तंत्रज्ञानात ही लांब पल्ल्याची उडी अत्यावश्यक आहे. ती उत्तमरीत्या साध्य करण्यासाठी परस्परांना वाव आणि विश्वास यांवर आधारलेला मजबूत आंतरराष्ट्रीय सहयोग उपयुक्त ठरेल. जगात संशयाचे आणि अटी–तटीची टोके गाठणारे वातावरण असतानादेखील, प्रभावी राजनयाद्वारे परराष्ट्र धोरणाद्वारे अशा सहयोगाचे दरवाजे उघडू शकतात. आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्था आजघडीला पुरवठा–साखळीच्या पुनर्बांधणीत गुंतली असून अधिक विश्वासार्ह उत्पादक उद्योगांच्याही शोधात आहे. अर्धवाहक (सेमीकंडक्टर), विजेरी वाहने, हरित तंत्रज्ञान या स्पर्धात्मक क्षेत्रांमध्ये तर या गरजा स्पष्टच दिसत आहेत. अशा वेळी केवळ 'विश्वबंधू' म्हणूनच भारताला या उद्योग–व्यापारव्यूहात सुस्थापित होण्याची प्रक्रिया सुनिश्चित करता येईल.

कोविडनंतरच्या जगात सर्वच महत्त्वाचे देश व्यूहात्मक स्वायत्ततेच्या शोधात आहेत. अगदी सर्वाधिक विकसित अशांनासुद्धा आज चिंता आहे ती इतरत्र अवलंबून राहिल्यामुळे आणि तेथेच अति–गुंतवणूक झाल्यामुळे आपल्या क्षमता, आपल्या शक्यता यांचा ऱ्हास तर होणार नाही ना, याचीच. या अशा जगात कशाचाही वापर हत्यारासारखा होऊ शकतो, हे लक्षात घेऊन भारतालाही आपल्या मूलभूत गरजा आणि कळीच्या पायाभूत सुविधांचा विकास राष्ट्रांतर्गतच होईल याची काळजी घ्यावी लागते. त्यामुळेच 'मेक इन इंडिया' उपक्रम निव्वळ आपल्या अर्थव्यवस्थेसाठीच नव्हे तर राष्ट्रीय सुरक्षेसाठीसुद्धा प्राणभूत ठरला आहे. आपण पाहतोच आहोत की, संरक्षणासारख्या आव्हानात्मक क्षेत्रांमध्ये या उपक्रमामुळे आता निर्यातीच्या शक्यताही खुल्या होऊ शकतात. संशोधन, अभिकल्प आणि नवोन्मेष (रिसर्च, डिझाइन, इनोव्हेशन) यांसाठीच्या जागतिक केंद्रांपैकी एक म्हणून उदयाला येण्यासाठी भारत आज वेगाने सज्ज होतो आहेच. अशावेळी आंतरराष्ट्रीय भागीदारांशी अधिक प्रकर्षाने सहयोग करूनच आपण विकसित भारताच्या ध्येयपथावर वेगाने प्रवास करू शकतो.


भारतीय कौशल्ये आणि भारतीयांची बुद्धिमत्ता यांचे वाढते भान हेदेखील आपल्या काळातले एक स्वागतार्ह वास्तव आहे. डिजिटल क्षेत्रामधील विश्वास आणि पारदर्शकता यांना प्राधान्य दिल्यामुळे या वास्तवाचे मोल अधिक आहे. जगात आमूलाग्र लोकसंख्यात्मक स्थित्यंतरे घडू लागलेली असल्याने विविध व्यवसायांमध्ये नव्या संधी निर्माण होत आहेत. या स्थितीचा लाभ घेण्यासाठी आपल्याला आपल्याच शिक्षण आणि प्रशिक्षण क्षमतांमध्ये प्रचंड प्रमाणात वाढ करावी लागेल. पण या कामी आपल्या भागीदारांनाही भारतीय मूल्ये आणि व्यवहार यांच्याशी सुसंगत असे शिक्षण आपल्याला हवे असल्याचे पूर्णत: उमगले, तर या क्षमतांचा सर्वोत्तम वापर करता येईल. आणि जेव्हा आपण आपल्या नागरिकांना, ते कोठेही असले तरी, सुरक्षेचे विश्वासार्ह वचन देऊ, तेव्हाच (आपल्या लोकसंख्येच्या) क्षमता खऱ्या अर्थाने खुलतील. हे सारे साध्य करण्याचे मोठे ध्येय भारतीय परराष्ट्र धोरणाने आज ठेवलेले आहे. त्या दृष्टीने युरोपीय राष्ट्रे, ऑस्ट्रेलिया, जपान आणि अन्य देशांशी आपण 'चलनशीलता (स्थलांतर) करार' अलीकडेच पूर्ण केलेले आहेत. भारतीयांसाठी जागतिक कार्यस्थळे खुली होण्यातून केवळ व्यक्तिगत संधीच वाढतील असे नव्हे, तर राष्ट्रीय क्षमतांची व्याप्ती वाढण्यासही मदत होईल.

सध्याचा काळ हा संघर्षांचा आहे तसाच वातावरणीय बदलांचाही आहे आणि त्यामुळे दळणवळणावर (कनेक्टिव्हिटी) मोठाच भार पडणार हेही उघड आहे. पुरवठा साखळ्या अधिक लवचीक करणे किंवा त्या अनावश्यक ठरवणे हे पर्याय आजच्या एकंदर वस्तूपुरवठा आणि रसद (लॉजिस्टिक्स) क्षेत्रापुढे आहेत. लाल समुद्रातील तणाव, सुएझ कालव्याची अडवणूक यांसारख्या प्रकारांचे परिणाम आपण अलीकडच्या काळात पाहिलेले आहेत. जोखीम–मुक्ती हा यावरचा उपाय; पण आपल्याला याचीच गरज आहे अशी जाणीव ठेवून तो उपाय योजणारे देश पुरेशा संख्येने असतील तरच तो गांभीर्याने योजला जाऊ शकतो आणि परिणामकारक ठरू शकतो. विशेष म्हणजे, अशा प्रकारच्या अनेक प्रयत्नांच्या केंद्रस्थानी भारत आहे. 'आयएमईसी कॉरिडॉर'मुळे अरबी द्वीपकल्पामार्गे युरोप आणि अटलांटिक सागरापर्यंतचा आपला प्रवास सुकर होतो आहे; तर 'आयएनएसटीसी कॉरिडॉर' हा इराण आणि रशियाला जोडतो आहे. आपल्या पूर्वेकडे 'ट्रायलॅटरल हायवे'मुळे आपण अगदी पार प्रशांत महासागरापर्यंत जाऊ शकणार आहोत.


**(सौजन्य: दै. लोकसत्ता)**

# लोकसभेतील बिनविरोध भाग्यवान

अठराव्या लोकसभा निवडणुकीसाठी देशभरात विविध राज्यांत मतदान चालू आहे. ४ जून रोजी मतमोजणी होणार आहे, पण एकेठिकाणी काँग्रेसच्या उमेदवाराने माघार घेतल्यामुळे व दुसरीकडे काँग्रेस उमेदवाराचा अर्ज निवडणूक अधिकाऱ्यांनी फेटाळून लावल्यामुळे मध्य प्रदेशातील इंदूर व गुजरातमधील सुरतमधून भाजपाचे उमेदवार लोकसभेवर बिनविरोध निवडून आले. आपले उमेदवारच ज्यांना संभाळता आले नाहीत, त्याला भाजपा तरी काय करणार? अब की बार ४०० पार असा संकल्प भाजपाने जाहीर केलाय. भाजपाने आपल्या पक्षाचे ३७० खासदार निवडून आणण्याचे लक्ष ठेवले आहे.


डॉ.फारूख अब्दुल्ला


डिंपल यादव


पी.एम. सईद


दिल कुमारी भंडारी

**लोकसभा** निवडणुकीच्या रिंगणातून प्रमुख विरोधी पक्ष समजल्या जाणाऱ्या काँग्रेसच्या उमेदवारांनी माघार घ्यावी ही पक्षाला मोठी नामुष्की आहे. इंदूरमधील काँग्रेस पक्षाचे उमेदवार अक्षय कांती बाम यांनी आपला उमेदवारी अर्ज मागे घेताच राज्यातील कॅबिनेट मंत्री व भाजपाचे दिग्गज नेते कैलाश विजयवर्गीस यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा व राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्या नेतृत्वाखालील भाजपामध्ये बाम यांचे स्वागत आहे असे ट्वीट केले. काँग्रेसने मात्र बाम यांनी उमेदवारी अर्ज मागे घ्यावा म्हणून त्यांच्यावर मोठा दबाव आणण्यात आला तसेच त्यांना धमक्या देण्यात आल्याचा आरोप केला आहे. विशेष म्हणजे बाम हे भाजपाचे आमदार रमेश मेंडोला यांच्यासह जिल्हाधिकारी कार्यालयात गेले व तेथे त्यांनी रितसर आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला. सुरतमधील काँग्रेस उमेदवार निलेश कुंभानी यांचा निवडणूक अधिकाऱ्यांनी अर्ज फेटाळल्यानंतर दुसऱ्याच दिवशी इंदूरमध्ये काँग्रेसचे उमेदवार बाम यांनी आपला अर्ज मागे घेतला, याला योगायोग म्हणावा काय?

सुरतमध्ये काँग्रेसच्या उमेदवाराच्या अर्जावर सुचक अनुमोदक म्हणून स्वाक्षऱ्या करणाऱ्या तिघा जणांनी प्रतिज्ञापत्रे सादर करून त्या स्वाक्षऱ्या आपल्या नसल्याचा छाननीच्या वेळी दावा केला. त्यामुळे काँग्रेस उमेदवाराचा अर्ज फेटाळण्यात आला. तसेच अन्य आठ उमेदवारांनीही आपले उमेदवारी अर्ज मागे घेतल्याने भाजपाचे मुकेश दलाल यांची बिनविरोध निवड होण्याचा मार्ग सुकर झाला.


इंदूरमधील घटनेबाबत काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष रितू पटवारी यांनी म्हटले आहे की, काही दिवसांपूर्वीच बाम यांच्यावर आयपीसी ३०७ कलमान्वये (खुनाचा प्रयत्न) पोलिसांनी गुन्हा दाखल केला. आदल्या रात्री त्यांना धमक्या दिल्या गेल्या व दबाव आणण्यात आला. काँग्रेसचे नेते बाम यांची भेट घेण्यासाठी त्यांच्या घरी पोहोचले तेव्हा त्यांच्या घराला पोलिसांचा वेढा होता व घरावर फडकणारा काँग्रेसचा झेंडाही गायब होता. बाम व अन्य उमेदवारांच्या माघारीमुळे भाजपाचे शंकर लालवाणी हे लोकसभेवर बिनविरोध निवडून आले.

काँग्रेस उमेदवारांच्या माघारीने भाजपाला लाभ झाला असला तरी असल्या लेच्यापेच्या लोकांना काँग्रेसने लोकसभेसाठी उमेदवारी दिलीच कशी? निवडणुकीत ते निवडून आले असते तरी ते नंतर भाजपामध्ये गेले नसते कशावरून? गुजरात व मध्य प्रदेशातील काँग्रेस उमेदवार कोणत्या आमिषाला बळी पडले की घाबरून त्यांनी माघार घेतली हे आज ना उद्या उघड होईल. सुरत किंवा इंदूर येथे भाजपाचे उमेदवार बिनविरोध निवडून आले ही काही प्रथमच घडलेली घटना नाही. गेल्या सतरा लोकसभा निवडणुकांमध्ये २८ अशा घटना घडल्या आहेत की, निवडणुकीच्या मैदानातून अन्य उमेदवारांनी माघार घेतल्यामुळे कोणाला तरी बिनविरोध निवडून येण्याचे भाग्य लाभले आहे. जम्मू-काश्मीरचे माजी मुख्यमंत्री फारूख अब्दुल्ला, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री व माजी केंद्रीय मंत्री दिवंगत नेते यशवंतराव चव्हाण, सपाचे सुप्रीमो अखिलेश यादव यांच्या पत्नी डिंपल यादव यांनाही लोकसभेवर बिनविरोध निवडून येण्याचे भाग्य लाभले होते.

१९५२ मध्ये देशात पहिली लोकसभा निवडणूक झाली तेव्हा पाच उमेदवार खासदार म्हणून बिनविरोध निवडून आले होते. १९६२ मध्ये दोन, तर १९७६ मध्ये पुन्हा पाच उमेदवार बिनविरोध खासदार म्हणून निवडून आले. चौथ्या लोकसभा निवडणुकीपर्यंत सतरा जणांना बिनविरोध खासदार होण्याचे भाग्य लाभले.

देशाचे माजी उपपंतप्रधान यशवंतराव चव्हाण हे महाराष्ट्रातील नाशिकमधून, जम्मू-काश्मीरचे माजी मुख्यमंत्री व नॅशनल कॉन्फरन्सचे प्रमुख फारूख अब्दुल्ला श्रीनगरमधून, नागालँडचे माजी मुख्यमंत्री व चार राज्यांचे राज्यपाल म्हणून काम केलेले व माजी केंद्रीय मंत्री पी. एम. सईद तसेच आंध्र प्रदेशातील विजयवाडामधून के. एल. राव यांना लोकसभेवर बिनविरोध निवडून येण्याची संधी मिळाली. लोकसभेवर बिनविरोध निवडून आलेले अनेक दिग्गज आहेत. आनंद चांद या अपक्ष उमेदवारालाही हे भाग्य प्राप्त झाले. १९५२ च्या निवडणुकीत आनंद चांद हे बिनविरोध खासदार म्हणून विजयी झाले. आनंद चांद हे विलासपूरच्या राजघराण्यातील ४४ वे शासक होते. १९६२ च्या लोकसभा निवडणुकीत माजी मुख्यमंत्री हरेकृष्ण महताब हे ओरिसातील अंगुल मतदारसंघातून मैदानात उतरले व बिनविरोध म्हणून निवडले गेले. ते त्यांच्या चाहत्यांमध्ये उत्कल केसरी


मुकेश दलाल, सुरत


शंकर लालवाणी, इंदुर

म्हणून ओळखले जायचे. १९६२ च्या निवडणुकीत गढवाल (आता उत्तराखंड) मधून काँग्रेसचे उमेदवार मानवेंद्र शाह यांची लोकसभेवर बिनविरोध निवड झाली. गढवाल राजघराण्याचे ते शेवटचे शासक होते. त्यांनीच १९४९ मध्ये गढवाल संस्थान भारतात विलिन करण्यासाठी कागदपत्रांवर स्वाक्षरी केली होती. १९५७ मध्ये ते पहिल्यांदा लोकसभेवर खासदार म्हणून निवडून गेले. ते या मतदारसंघातून तब्बल आठ वेळा विजयी झाले. १९७१ च्या निवडणुकीत त्यांचा पराभव झाला. नंतर आर्यलँडमध्ये त्यांनी भारताचे राजदूत म्हणून काम केले. १९७७ मध्ये सिक्किम व अरुणाचल प्रदेशमधून दोन उमेदवार लोकसभेवर बिनविरोध निवडून गेले. १९८५ मध्ये झालेल्या लोकसभा पोटनिवडणुकीत सिक्किममधून दिल कुमारी भंडारी यांची बिनविरोध निवड झाली. सिक्किममधून लोकसभेवर निवडून जाणाऱ्या त्या पहिल्या महिला खासदार ठरल्या. १९८९ मध्ये जम्मू-काश्मीरमध्ये दहशतवाद शिगेला पोहोचला होता. तेथील प्रादेशिक पक्षांनी निवडणुकीवर बहिष्कार टाकला होता. तीन लोकसभा मतदारसंघांपैकी श्रीनगरमधून नॅशनल कॉन्फरन्सचे मोहंमद शफी भट्ट हे बिनविरोध विजयी झाले, तर अन्य दोन मतदारसंघात पाच टक्क्यांपेक्षा कमी मतदान झाले. समाजवादी पक्षाच्या उमेदवार म्हणून डिंपल यादव यांना २०१२ मध्ये कन्नोज लोकसभा मतदारसंघात झालेल्या पोटनिवडणुकीत बिनविरोध विजयी म्हणून घोषित करण्यात आले होते. २०१९ मध्ये केंद्र शासित प्रदेश होण्यापूर्वी जम्मू-काश्मीरमध्ये आजवर चारजण लोकसभेवर बिनविरोध निवडून गेले आहेत. आंध्र प्रदेश व सिक्किममधून एकापेक्षा जास्त उमेदवार बिनविरोध खासदार झाले आहेत. आजवर काँग्रेसचे सर्वाधिक २० जण लोकसभेवर बिनविरोध निवडून गेले आहेत. ■

# विविध आंदोलनातून झाला महाराष्ट्रात भाजपाचा विस्तार

● माधव भांडारी, प्रदेश उपाध्यक्ष

> २०१४ च्या लोकसभा निवडणुकीमध्ये राज्यातील अनेक वर्षांची प्रस्थापित राजकीय समीकरणे मोडीत निघाली. नरेंद्र मोदी यांनी केंद्रातील सत्ता बदलण्याच्या केलेल्या आवाहनाला महाराष्ट्रानेही भरभरून प्रतिसाद दिला. भाजपाने २३ तर युतीतील सहकारी पक्षाने शिवसेनेने १८ जागा मिळवल्या. त्यावेळी राज्यात सत्तेवर असलेल्या काँग्रेस-राष्ट्रवादीला अवघ्या ६ जागा मिळाल्या.



**या** निवडणुकीनंतर ६ महिन्यांनी झालेल्या विधानसभा निवडणुकीपूर्वी भाजपा नेतृत्वाने युतीतील सहकारी पक्षाकडे वाढलेल्या ताकदीनुसार जागावाटप करण्याची मागणी केली. ही मागणी शिवसेनेने मान्य न केल्यामुळे युती तुटली. विधानसभा निवडणुकीत १२४ जागा जिंकून भाजपाने सरकार स्थापन केले. महाराष्ट्रात प्रारंभी जनसंघ व नंतर भारतीय जनता पार्टीच्या उभारणीसाठी आयुष्य खर्ची घातलेल्या कार्यकर्त्यांच्या अनेक पिढ्यांच्या कष्टाचे चीज झाले. ३१ ऑक्टोबर २०१४ रोजी देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. लक्षावधी भाजपा कार्यकर्त्यांसाठी हा क्षण ऐतिहासिक होता.

२०१४ ते २०१९ अशी सलग पाच वर्षे देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकार महाराष्ट्रात सत्तेत होते. या काळात भारतीय जनता पार्टीने ग्रामपंचायतीपासून महापालिकांपर्यंत सर्वत्र यशाचा झेंडा फडकवत ठेवला. २०१९ च्या निवडणुकीत युतीला स्पष्ट बहुमत मिळूनही शिवसेनेच्या दगाबाजीमुळे भारतीय जनता पार्टीला राज्यात सरकार स्थापन करता आले नाही. प्रारंभीच्या काळात महाराष्ट्रातील जनसंघाच्या उभारणीत शहरी मंडळींची संख्याच जास्त होती. त्यामुळे सहकारी शेतीविरुद्धचे आंदोलन, कापूस उत्पादकांचे आंदोलन यांसारखी ग्रामीण भाग ढवळून काढणारी आंदोलने यशस्वीरीत्या केल्यानंतरही जनसंघ हा शहरी पक्षाचा चेहरा बदलू शकला नव्हता. बारा बलुतेदारांच्या आधारावर उभ्या असलेल्या बहुजन समाजात जनसंघाला स्थान मिळाले नव्हते.

१९७७ पूर्वी एकदाच- १९७२ च्या निवडणुकीत जनसंघाने अधिकाधिक जागा लढवल्या होत्या, पण त्याही वेळेस जनसंघ केवळ १२७ जागा लढवू शकला होता आणि त्यातील फक्त पाच जागीच जनसंघाला यश मिळाले होते. २७ जिल्हे असे होते की, १९७८ पूर्वी त्या जिल्ह्यांमधून जनसंघाला एकदाही एकही जागा जिंकता आली नव्हती. जनसंघाला मिळणाऱ्या मतांची टक्केवारी ९ टक्क्यांवर कधी जाऊ शकली नाही. एकीकडे महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात जाती जमातींच्या बेरीज-वजाबाकीची घट्ट वीण होती आणि त्या सर्व गणितांमध्ये जनसंघाला काहीही स्थान नव्हते. तरी दुसरीकडे याच ग्रामीण भागावर डाव्या विचारांचा पगडा होता आणि त्यांच्या दृष्टीने जनसंघ हा शोषणकर्त्यांचा, सामाजिक समतेच्या शत्रूचा पक्ष होता. काँग्रेस आणि डाव्या मंडळींनी हेतुतः रंगवलेल्या या

प्रतिमेमुळे जनसंघाच्या कार्यकर्त्यांना हिंसक विरोधाला तोंड देतच काम करावे लागत होते.

१९७१-७२ पासून सुरू झालेले नवनिर्माण आंदोलन, १९७५ची आणीबाणी व आणीबाणीच्या विरोधातील आंदोलन या दोन चळवळीमुळे ही कोंडी फोडण्यात जनसंघाला यश मिळाले. आणीबाणीच्या पार्श्वभूमीवर झालेल्या १९७८च्या निवडणुकीत १५ जिल्ह्यांमधून पूर्वाश्रमीचे जनसंघीय विधानसभेवर निवडून गेले. १९८० मध्ये जनता पार्टीतून बाहेर पडून एकट्याच्या जिवावर लढविलेल्या निवडणुकीत भाजपाने सात जिल्ह्यांमधून यश मिळविले. तिथपासून आजतागायत भाजपाच्या प्रभावक्षेत्राचा विस्तारच होत राहिलेला आहे. १९९० पासून २०१४ पर्यंत झालेल्या सर्व निवडणुका भाजपाने सेनेबरोबर युती करून लढविल्या. त्या युतीचा फायदादेखील भाजपाला निश्चितच मिळाला.

सर्व स्तरांत काम १९८० पासून आपला विस्तार करण्यात भाजपाला जेयश मिळाले त्याची दोन-तीन प्रमुख कारणे आहेत. एक म्हणजे ग्रामीण भागातील वेगवेगळ्या जाती समूहांची गणिते जमवून समाजाच्या सर्व थरांमधील नेतृत्व तालुका पातळीवर उभे करणे. या सामाजिक जुळणीला आजकाल 'सोशल इंजिनीअरिंग' म्हणतात. महाराष्ट्राच्या बहुतांश भागांतील विविध लहान-मोठ्या जाती समूहांचे समर्थन मिळविणारी सामाजिक जुळणी करण्यात भाजपाला यश मिळाले. त्यामुळे राज्यातील प्रबळ अशा इतर मागासवर्गीयांचे नेतृत्व भाजपाच्या झेंड्याखाली उभे राहिले. त्याच्याच जोडीला भाजपाने अनेक लहान-मोठी आंदोलने केली. संघटनात्मक विस्ताराचे अत्यंत योजनाबद्ध प्रयत्न केले. कापूस उत्पादकांचे आणि शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीचे आंदोलन या दोन आंदोलनांनी महाराष्ट्राच्या खेड्यापाड्यांत भाजपाची ओळख पोहोचली. मोतीराम लहाने, पांडुरंग फुंडकर, महादेव शिवणकर यांनी विदर्भात कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठी सातत्याने लढे दिले. मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतरांसाठी केलेल्या चळवळीतून दलितविरोधाचा शिक्का पुसून टाकण्याचा यशस्वी प्रयत्न करतानाच भाजपाने स्वतःचे नवे तरुण दलित नेतृत्वही घडवले. महाराष्ट्रातला अन्य कोणताही राजकीय पक्ष पाण्याच्या प्रश्नांकडे लक्ष देत नव्हता, तेव्हा १९८५ मध्ये भाजपाने औरंगाबादला पहिली पाणी परिषद घेतली. ती पाणी परिषद आणि परळी वैजनाथ येथील दुष्काळी परिषद यातून मराठवाड्यातील ग्रामीण भागांच्या निकडीच्या प्रश्नाशी भाजपाने स्वत:ला जोडून घेतले. आज मराठवाडा हे भाजपाचे एक बलस्थान बनले आहे.

राज्याच्या विकासाच्या संदर्भात विविध विभागांमधील असमतोल हा विषय तर भाजपानेच राज्याच्या विषयपत्रिकेवर आणला. या संदर्भातील दांडेकर समितीची नेमणूकदेखील भाजपाने निर्माण केलेल्या वातावरणाच्या पार्श्वभूमीवर झाली होती. रोजगार हमी योजनेतील वेगवेगळ्या मुद्यांसाठी केलेल्या आंदोलनांमुळे ग्रामीण भागांतील मजुरीचे किमान हमी दर ठरवले गेले. बेरोजगारांच्या प्रश्नांसाठी केलेल्या प्रचंड आंदोलनातून अत्यंत गुणवत्तापूर्ण असे नवे तरुण नेतृत्व सर्वस्तरावर उभे राहिले. विकासाशी निगडित असलेले दीर्घकालीन मुद्दे आणि जनतेच्या जिव्हाळ्याचे तात्कालिक प्रश्न यांच्या आधारावर उभी केलेली संघटना व सर्वस्तरावरील नेतृत्व हा आजच्या भाजपाचा पाया आहे.

गेल्या २५ वर्षांमध्ये असंख्य लहान-मोठ्या व्यक्तींनी कष्ट घेतले आहेत. त्यासर्वांची नोंद येथे घेणे शक्य नाही. संघटन विस्ताराची ही दिशा ठरवून देण्याचे काम कै. वसंतराव भागवत यांनी यशस्वीरीत्या केले. १९८० ते १९८३/८४ या काळात कै. उत्तमराव पाटील, प्रमोद महाजन, कै. प्रभाकरपंत पटवर्धन, कै. लक्ष्मणराव मानकर आदींनी उभा महाराष्ट्र पिंजून काढला. विशेषत: कै. उत्तमराव पाटील व प्रमोद महाजन यांनी या काळामध्ये प्रत्येक तालुक्यापर्यंत पोहोचणारे दौरे दोन-तीनदा केले. गोपीनाथ मुंडे, धरमचंद चोरडिया, विश्वास गांगुर्डे, प्रकाश जावडेकर, पांडुरंग फुंडकर, अरुण अडसड, नितीन गडकरी यांच्यासारख्या नेते मंडळींनी गेली दोन-अडीच दशके पक्षाच्या उभारणीसाठी अथक परिश्रम घेतले. याच काळात रामभाऊ म्हाळगी, हशू अडवाणी, श्रीधर नातू, रामदास नायक, प्रा. ना. स. फरांदे, प्रा. राम कापसे, रामभाऊ नाईक यांच्यासारख्यांनी संसद व विधिमंडळात आपल्या कर्तृत्वाने स्वतःचा व पक्षाचा प्रभावी ठसा उमटवला. व्यासपीठावर दिसणाऱ्या नेत्यांच्या बरोबरीने पडद्याआड राहून काम करणाऱ्या डॉ. शांताराम बापू करमळकर, वसंतराव पटवर्धन यांच्यासारख्या अनेक कुशल संघटक कार्यकर्त्यांच्या फळीने पक्षाच्या वाटचालीत आपले मोठे योगदान दिले. ■

# पराभव दिसू लागल्याने संविधान बदलाचा अपप्रचार

● ॲड. धर्मपाल मेश्राम

> लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये एकीकडे भारतीय जनता पार्टी विकसित भारताचे स्वप्न साकारण्यासाठी विकासाची गॅरंटी देत आहे तर दुसरीकडे विकासाची कुठलेही धोरण नसलेली विरोध विशेषत: काँग्रेस 'संविधान खतरे में हैं...' ची बतावणी करीत विशिष्ट जनसमुदायाला स्पष्ट करून, संभ्रमातून मत लाटण्याच्या प्रयत्नात आहे. काँग्रेस पक्ष आणि महाविकास आघाडीतील साथीदारांकडून संविधानाबद्दल होणारा अपप्रचार खोटारडा आहे. मुळात संविधान बदलणे कोणालाही शक्य नाही.

**केशवानंद** भारती आणि गोलकनाथ या दोन्ही खटल्यांमध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या सात सदस्यीय खंडपीठाने संविधानाची मूळ चौकट बदलता येणार नाही, असा निकाल दिला आहे. राजकीयदृष्ट्या भारतीय जनता पार्टीसमोर हतबल झाल्यानंतर काँग्रेस आणि त्याच्या मित्र पक्षांनी खोट्या नॅरेटिव्हचा आधार घेतला आहे.

भाजपाने 'अब की बार ४०० पार'चा नारा दिला आहे. भारताचे संविधान बदलण्यासाठीच भाजपाला ४०० जागा हव्या आहेत, असा अपप्रचार काँग्रेसकडून केला जात आहे. संसदेत कितीही बहुमत असले, तरी संविधानाचा मूळ गाभा कुणीही बदलू शकत नाही, हे संविधानाबद्दलचे सामान्य ज्ञान काँग्रेसला नाही. काँग्रेस पक्षाने सत्तेत असताना आतापर्यंत ७९ वेळा संविधानात दुरुस्त्या



केलेल्या आहेत. स्वातंत्र्याच्या ७५ वर्षात जेवढ्या वेळा काँग्रेस आणि काँग्रेसच्या नेतृत्वातील सरकारे आली, त्यांनी तेवढ्या वेळा संविधानाचे लचके तोडले. काँग्रेसने दुरुस्तीच्या नावाखाली संविधानाच्या मूलभूत तत्वाला, गाभ्याला, आत्म्यालाच धक्का पोहोचविला आहे. तरीही काँग्रेस संविधानाच्या संदर्भात भाजपच्या विरोधात खोटारडा प्रचार करत आहे. ज्याचा संविधानाचा थोडा जरी अभ्यास असेल त्याला हे समजेल की, संविधान निर्मात्यांनी काळानुसार घटनादुरुस्तीची (अमेंडमेंट) करण्याची परवानगी दिली असली, तरी संविधान मुळापासून बदलण्याची परवानगी दिलेली नाही. सर्वोच्च न्यायालयानेही हा मुद्दा निकालात स्पष्ट केला आहे. सर्वोच्च न्यायालयाचा निकाल हा कायद्यासारखा असतो व तो बंधनकारक असतो, हे सामान्य ज्ञान तरी काँग्रेसवाल्यांना आहे की नाही, याची मला शंका वाटते. या देशामध्ये

संवैधानिक व्यवस्था कुणी हलवू शकणार नाही, कितीही बहुमत असले, तरी संविधानाच्या गाभ्याला हात लावला जाऊ शकत नाही. कारण संवैधानिक व्यवस्थेमध्ये तशा कोणत्याही पद्धतीची तरतूद नाही, हे अनेकदा सिद्ध झाले आहे.

देशाची संवैधानिक व्यवस्था कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायपालिका या तीन खांबांवर आहे. कायदे करणारी संस्था असली, तरीदेखील ती सर्वोच्च नाही. संसदेने किंवा विधिमंडळाने केलेल्या कायद्यांचे पुनर्विलोकन करण्याचा अधिकार न्यायालयाला आहे. तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी ४२ व्या घटनादुरुस्तीने संविधानाच्या प्रास्ताविकेमध्येदेखील दुरुस्ती केली. केवळ प्रास्ताविकेमध्येच दुरुस्ती केली अंस नाही, तर मूळ गाभ्यालादेखील हात लावण्याचा प्रयत्न केला. एवढेच नाही, तर कोणत्याही, न्यायालयाला 'कॉन्स्टिट्यूशनल अमेंडमेंटला रिव्ह्यू' करण्याचे अधिकार नाहीत, अशा पद्धतीचीही तरतूद केली. काँग्रेसने त्यांच्या सत्तेच्या ५०-५५ वर्षाच्या कार्यकाळात काय काम केली, काय निर्णय घेतले, कोणत्या पद्धतीचा विकास साधला, कोणत्या पद्धतीची व्यवस्था निर्माण केली आहे, त्याबद्दल बोलायला पाहिजे. भाजपाने काही चुकीचे केले असेल तर ते अधोरेखित करीत आपली बाजू मांडून पुढे जाणे अपेक्षित होते. संविधानाच्या संवेदनशील मुद्यावर खोटा प्रचार करून घेण्याचा प्रयत्न आज विरोधी पक्ष करीत आहे.

भारतीय जनता पक्षाने आणि पक्षाशी निगडीत कुठल्याही संघटनेने कधीच संविधानाविरोधी कृत्य केले नाही. भाजपाने मागील १० वर्षांत संविधानात कोणत्या दुरुस्त्या केल्या आणि त्या कशासंदर्भात केल्या, हे सर्व जनतेसमोर आहे. भाजपाव्दारे करण्यात आलेल्या या दुरुस्त्यांचा अभ्यास करावा, पण त्यासोबत काँग्रेसच्या कार्यकाळात जवळपास ७९ घटनादुरुस्त्या करण्यात आल्या; त्या नेमक्या कोणत्या होत्या, त्याचादेखील अभ्यास करण्याची गरज आहे. त्यामुळे दोन्ही सरकारांच्या कार्यकाळांच्या तुलनात्मक अभ्यासामुळे सत्य पुढे येईल. संविधान बदलणार नाही याची गॅरंटी भाजपा देतो. कोणत्याही प्रकारे संविधानाच्या मूलभूत गाभ्याशी कोणत्याही पद्धतीची छेडछाड आज उद्या किंवा येणाऱ्या काळात कोणीही करू शकणार नाही. भाजपा असे कृत्य कधीच करू शकणार नाही. कारण आमच्या नेतृत्वावर

**काँग्रेसचा देशातील शोषित, वंचित आणि मागासवर्गीयांना आरक्षण देण्यास नेहमीच विरोध राहिला आहे. १९५५ मध्ये काका कालेलकर आयोगाने आणि त्यानंतर मंडल आयोगाने विकासाच्या मुख्य प्रवाहापासून बाजूला पडलेल्या मागासवर्गीय समाजाला आरक्षण देण्याची शिफारस केली होती. मात्र काँग्रेस सरकारने ही शिफारस स्वीकारली नाही.**

आमचा विश्वास आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी २०४७ पर्यंत विकसित भारताचा निर्धार केला आहे. विकसित भारत हे प्रत्येक सर्वसामान्य माणसाची स्वप्न आहे. हे स्वप्न पूर्ण करण्यासाठी भारतीय जनता पक्षाला संख्या वर पाहिजे भाजपाने मागच्या दहा वर्षात देशातल्या सर्वसामान्य लोकांसाठी काम केले आहे. समाजाभिमुख, लोकाभिमुख विकासाची कामे केलेली आहेत. अनेक महत्त्वाच्या सुधारणा केलेल्या आहेत. घटनेच्या ३७० व्या कलमामुळे जम्मू काश्मीरला स्वतंत्र दर्जा मिळाला होता व त्याचे स्वतंत्र संविधान होते. 'एक देश मे दो निशान. दो प्रधान, दो विधान नही चलेंगे' असे म्हणत डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी बलिदान दिले. 'विधान' म्हणजे संविधान. बाबासाहेबांनी दिलेले देशाचे संविधान ३७० कलमामुळे जम्मू-काश्मीरमध्ये पूर्णपणे लागू होत नव्हते. मोदी सरकारने ३७० कलम हटविल्यामुळे आज संपूर्ण देशामध्ये देशाचे संविधान पूर्णपणे लागू झाले आहे.

काँग्रेसच्या नेत्यांनी या देशातल्या दलितांना व मुस्लिमांना आपल्या स्वार्थासाठी वेठीस धरले आणि देशाला विकासापासून वंचित ठेवले. त्या नेत्यांवर विश्वास ठेवण्याची निश्चितच वेळ नाही. त्यामुळे आज भारतीय जनता पार्टी देशभरातील जनतेला आवाहन करीत आहे की, अशा प्रलोभनांना किंवा चुकीच्या समजांना रूढ करण्याचे राजकारण करीत असलेल्यांच्या विषयांना बळी पडू नये. जे सुज्ञ, शिक्षित आहेत अशा सर्व लोकांनी आज प्रत्येक गोष्टीचा अभ्यास करून निष्कर्ष काढावा. देशातील संविधान कोणी बदलू शकत नाही. या पवित्र संविधानाच्या आधारे विकसित भारत निर्माण करण्यासाठी सर्वजण सोबत काम करू या...

**(लेखक हे पक्षाचे प्रवक्ते व प्रदेश उपाध्यक्ष आहेत.)**

# फारुख अब्दुल्ला रुपी सूर्याजी पिसाळ

मोदी सरकारच्या गेल्या १० वर्षांच्या काळात आंतरराष्ट्रीय जगतात भारताची पत वाढते आहे. १९४७ पासून काश्मीरचा काही भूभाग पाकिस्तानने बळकावून ठेवलेला आहे. आज भारत तो परत घेऊ शकतो. मात्र तसे करण्याची गरज पडणार नाही. कारण या पाकव्याप्त काश्मीरमधील नागरिकच भारतात येण्यास इच्छुक असल्यामुळे तो परिसर भारतात आणता येईल, अशा आशयाचे निधन विधान केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी केले आहे. याच्या या विधानाच्या उत्तरात काश्मीरमधील नॅशनल कॉन्फरन्सचे नेते फारूक अब्दुल्ला यांनी पाकिस्तानने हातात बांगड्या भरलेल्या नाही असे विधान केल्याचे वृत्त आहे.



**फारूक** अब्दुल्लांनी असे विधान केले असेल तर हे प्रकरण गंभीरच म्हणायला हवे. अर्थात काश्मीरमधील एक गट सुरुवातीपासून पाकधार्जीणा राहिला आहे. त्यामुळेच फारूक अब्दुल्लांनी असे विधान केले आहे हे उघड आहे. आपल्या देशातील काश्मीरचा भूभाग हा कायम वादग्रस्त राहिला आहे. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यावर काश्मीरने भारतात सहभागी व्हावे किंवा नाही यावर वाद सुरू होता. त्यावेळी काश्मीरमध्ये राजा हरि सिंह हे सत्तेत होते. त्याच दरम्यान पाकिस्तानने राजा हरि सिंह यांच्या काश्मीर संस्थानवर हल्ला केला. त्यातील काही भूभाग त्यांनी बळकावला. त्यावेळी काश्मीरने भारतात सहभागी होण्याच्या अटीवर तत्कालीन भारत सरकारने काश्मीरला लष्करी मदत दिली, आणि पाकिस्तानचे सैन्य परतवून लावले, अशा आशयाची इतिहासात नोंद आहे. मात्र त्यावेळी जो भूभाग पाकिस्तानने बळकावला तो परत घेण्याचे कोणतेही प्रयत्न तत्कालीन काँग्रेस सरकारने केले नाहीत. इतकेच काय तर संयुक्त राष्ट्र संघात तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरू यांनी चुकीची माहिती दिल्यामुळे हा प्रश्न अधिकच गंभीर बनल्याचाही आरोप केला जातो.

तेव्हापासून हा भूभाग पाकिस्तानच्या ताब्यात आहे. कागदोपत्री हा भूभाग पाकव्याप्त काश्मीर म्हणून ओळखला जातो. त्याचवेळी उर्वरित काश्मीर हा देखील पाकिस्तानचा भूभाग आहे असा दावा आजही पाकिस्तान सरकार करते. इतकेच काय पण काश्मीरमधील काही पाक धार्जिणे मुस्लिम नेते देखील असाच दावा अनेकदा करतात.

अशाच विविध कारणांमुळे जरी काश्मीर भारतात सहभागी झाला तरी तत्कालीन मुस्लिम नेत्यांच्या मागणीनुसार पंडित नेहरूंनी घटनेच्या ३७० कलमान्वये काश्मीरला विशेष दर्जा देऊ केला होता. या दर्जानुसार काश्मीरला त्यांचा स्वतंत्र ध्वज आणि स्वतंत्र घटना ठेवण्याचा अधिकार देण्यात आला होता. त्यामुळे काश्मीरमध्ये देशातील इतर कोणत्याही भागातील नागरिकांना कोणतीही मालमत्ता खरेदी करता येत नव्हती.

काश्मीरमधल्या मुस्लिम शासकांनी मधल्या काळात तिथे कित्येक पिढ्यांपासून मुक्कामी असलेल्या काश्मिरी ब्राह्मणांना काश्मीरमधून हुसकावून लावले होते, आणि हे काश्मिरी ब्राह्मण देशभरात अक्षरशः निर्वासितासारखे राहत होते. ज्यावेळी पंडित नेहरूंनी काश्मीरला विशेष दर्जा दिला, त्या वेळेपासून तत्कालीन जनसंघ म्हणजेच आजच्या भारतीय जनता पक्षाने असा विशेष दर्जा देण्याला विरोधच केला होता. काश्मीरमध्ये कित्येक वर्ष भारतीयांचा अभिमान असलेला तिरंगा फडकवू दिला जात नव्हता. त्यामुळे १९९२ मध्ये तत्कालीन भाजप नेते डॉ. मुरली मनोहर जोशी यांनी शेकडो समर्थकांसह तिथे जाऊन श्रीनगरच्या लाल चौकात तिरंगा फडकवला होता. भारतीय जनता पार्टीच्या प्रत्येक जाहीरनाम्यात काश्मीरचा ३७० कलमान्वये असलेला विशेषाधिकार काढून घेतला जाईल असे आश्वासन दिले जात होते.

भारतीय जनता पार्टीने आपला शब्द पाळला. ५ ऑगस्ट २०१९ रोजी संसदेच्या दोन्ही सभागृहांनी कलम ३७० रद्दबातल ठरवणारा प्रस्ताव पारित केला आणि काश्मीरमधील विशेष अधिकार संपवण्यात आले. तेव्हापासून जम्मू आणि काश्मीर हे दोन्ही भारताच्या इतर राज्यांपैकी सारखेच राज्य म्हणून ओळखले जात आहेत. आता पाच वर्षात तिथे हळूहळू शांतता प्रस्थापित केली जात आहे. लवकरच काश्मीरमध्ये नियमित निवडणुका घेऊन लोकशाही पद्धतीने राज्यकारभार सुरू करण्याचे ही केंद्र सरकारने जाहीर केले आहे.

या सर्व प्रकारामुळे भाजप विरोधकांना कायम पोटशुळ उठत असतो. अजूनही काँग्रेस सत्तेत आली तर आम्ही काश्मीरला कलम ३७० अन्वये देण्यात आलेले विशेषाधिकार परत बहाल करू असे आश्वासन काँग्रेस देत असते. त्याचबरोबर काश्मीरमधल्या नॅशनल कॉन्फरन्स आणि तत्सम प्रादेशिक पक्षांना पाकिस्तानचे प्रेम उफाळून येत असते. तसेच पाकिस्तान प्रेम इथेही उफाळून आलेले दिसते आहे.

आज जो भूभाग पाकव्याप्त काश्मीर म्हणून ओळखला जातो, तो भूभाग १९४७ मध्ये पाकिस्तानने बेकायदेशीररित्या बाळकावलेला आहे. भारत तो कधीही परत घेऊ शकतो. सध्या पाकिस्तान हा आर्थिकदृष्ट्या पूर्णतः डबघाईला आलेला देश आहे. त्यामुळे पाकव्याप्त काश्मीरमधील नागरिकच भारतात येण्यासाठी उत्सुक आहेत असे बोलले जाते. जर पाकव्याप्त काश्मीर हा पाकिस्तानपासून तोडून मूळ भारताला जोडला गेला आणि तिथे भारतीय प्रशासन सक्रिय झाले तर तिथल्या नागरिकांना बरे दिवस येतील असे वाटते आहे. त्यामुळेच तिथले नागरिकच स्वतःहून भारतात जोडले जातील अशा आशयाचे विधान संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी केले आहे.

आज पाकव्याप्त काश्मीर परिसर हा तसाही भारतासाठी एक डोकेदुखीच ठरलेला आहे. या ठिकाणी दहशतवादी गटांचे अड्डे बनलेले आहेत. या गटांना पाकिस्तान सरकारचा छुपा पाठिंबा आहे. त्यामुळे हा परिसर जर भारताला जोडला गेला तर इथले दहशतवादी अड्डे उध्वस्त करता येतील आणि त्यामुळे देशात ठिकठिकाणी पाकिस्तानी आतंकवादी निर्माण करत असलेला उपद्रवही आटोक्यात आणता येऊ शकेल. त्यामुळे हा परिसर भारताला जोडला गेला आणि तिथे भारताची सत्ता लागू झाली तर ते देशाच्या हिताचे ठरणार आहे. त्यामुळेच पाकधार्जिण्या फारूक अब्दुल्लांना पोटशूळ उठला आहे आणि त्यांना पाकिस्तानच्या लष्करी सामर्थ्याची अचानक जाणीव झाली आहे. पाकिस्तान जवळही अण्वस्त्र आहेत याची त्यांनी राजनाथ सिंह यांना आठवण करून दिली आहे.

राजनाथ सिंह जेव्हा एखादे विधान करतात तेव्हा देशाच्या लष्करी सामर्थ्याबाबत त्यांच्या मनात असलेला विश्वास बोलत असतो. गत दहा वर्षात देशाने सर्वच आघाड्यांवर आपले सामर्थ्य वाढवले आहे. तरीही देशातील काही देशद्रोही मंडळींना आज पाकिस्तानचाच पुळका येतो आहे ही बाब चिंताजनक आहे. देशाला स्वातंत्र्य मिळून आज ७५ वर्षाहून अधिक काळ लोटला आहे. देश सर्वार्थाने एक सक्षम, स्वयंपूर्ण राष्ट्र म्हणून पुढे येतो आहे. सर्वच आघाड्यांवर देश स्वयंपूर्ण होतो आहे. अशावेळी देशातील काही घटकांनी अशा प्रकारे शत्रू राष्ट्राशी बाजू घेत आपल्या सैन्याला आणि लष्करी सामर्थ्याला कमी दाखवण्याचा प्रयत्न करावा हा प्रकार चीड आणणारा संतापजनकच म्हणावा लागेल.

अशा देशद्रोही मानसिकतेचा फक्त निषेध करून चालणार नाही, तर अशी देशद्रोही मानसिकता आणि अशा मानसिकतेचे देशातील सूर्याजी पिसाळ शोधून त्यांना ठिकाणावर आणले पाहिजे, आणि ही सूर्याजी पिसाळांची मानसिकता संपविली पाहिजे. ■

# जीएसटीची भरारी...

● डॉ. रामकृष्ण कळशेकर

> सन २०१७ मध्ये देशात लागू झालेल्या वस्तू व सेवा कराच्या (जीएसटी) संकलनाने विक्रमी भरारी घेतली आहे. ही भरारी म्हणजे जीएसटीविरोधकांसाठी एक धडाच आहे.त्याचसोबत, या कायद्यात अनेक सुधारणा होणेही गरजेचे आहे, हे या निमित्ताने लक्षात घ्यायला हवे.

**आपल्या** देशातील सेवावस्तू कराच्या (जीएसटी) सद्यस्थितीच्या वर्णनासाठी वरील शब्द अगदी चपखल ठरतील. जीएसटीच्या माध्यमातून एप्रिल २०२४ या एकाच महिन्यात २.१ लाख कोटी रुपये इतके विक्रमी संकलन झाले. एवढेच नव्हे तर त्यातील राज्यसरकारांचा वाटा देखील त्वरित त्यांना देऊन झाला, हे या डिजिटल पद्धतीने आकारल्या जाणाऱ्या करप्रणालीचे एक मोठे फलित आहे. तसे बघायला गेले तर २ लाख कोटी रुपये संकलनाचा टप्पा एप्रिलमध्ये पार होईल, असे भाकीत महिन्याच्या सुरुवातीलाच सरकारी सूत्रांनी केले होतं. त्याचे कारण म्हणजे आर्थिक वर्षाच्या अखेरीस, मार्च महिन्यात सर्वच कंपन्या आपापली विक्रीचे वार्षिक लक्ष्य पूर्ण करण्यासाठी अधिकचा जोर लावतात आणि त्यामुळे वर्षातील सर्वाधिक मासिक जीएसटी संकलन हे एप्रिलमधेच होते.

या वर्षीच्या एप्रिलमध्ये २.१ लाख कोटी रुपयांचा संकलनाचा पल्ला गाठला असला तरी सन २०२४-२५ या वर्षासाठी दरमहा सरासरी करसंकलन १.८ लाख कोटींच्या आसपास राहणे अपेक्षित आहे. गेल्या वर्षी एप्रिल २०२३ मध्ये जीएसटी संकलन १.८७ लाख कोटी रुपये, तर संपूर्ण २०२३-२४ साठी मासिक सरासरी ही १.६८ लाख कोटी रुपये इतकी होती.सन २०१७ मध्ये अनेक घटकांचा रोष पत्करून, अगदी राजकीयदृष्ट्या आत्मघातकी ठरू शकेल असा हा आमूलाग्र बदल सरकारने अंमलात आणला. त्याद्वारे विविध अप्रत्यक्ष कर ह्या एकाच करात समाविष्ट झाले; पण त्याचबरोबर मासिक, तिमाही आणि वार्षिक परतावे भरण्याचा भार लहानमोठ्या सर्व व्यावसायिक आस्थापनांवर पडला. संपूर्ण डिजिटल प्रणालीमुळे करचोरीच्या संधी कमी झाल्या आणि करचुकव्यांना आळा बसला. हे जे सुधारणेचे लहानसे रोप सात वर्षांपूर्वी लावले होते त्याची फळे आता आपल्याला बघायला मिळत आहेत. अर्थात मधल्या काळात अनेक बदल, दुरुस्त्या त्यात करण्यात आले, आणि त्यात सर्व राज्यांच्या अर्थमंत्र्यांचा सहभाग असलेल्या 'जीएसटी कौन्सिल'ने महत्वाची भूमिका बजावली, हे नमूद केलेच पाहिजे. अर्थ मंत्रालयाने देखील कसून तपासणी आणि आग्रही वसुलीसाठी बरेच प्रयत्न केले आणि त्याचाही विक्रमी करसंकलनासाठी उपयोग झाला.

सात वर्षांपूर्वी भारतात सर्वत्र जीएसटी लागू करणे हे खरोखरच शिवधनुष्य उचलण्यासारखे कठीण काम होते. कारण जुन्या करप्रणालीतील अकार्यक्षमतेत केंद्र सरकार, राज्य सरकारांपासून, नोकरशाही ते लहान उद्योजकांपर्यंत सगळ्यांचे हितसंबंध गुंतलेले होते. अप्रत्यक्ष कर लावण्याचा राज्य सरकारांचा अधिकार जीएसटीने जाणार होता. तर उद्योगजगात कुठल्याही नियमांच्या अनुपालनात (compliance) असणारे औदासिन्य आणि कर भरायला लागणे म्हणजे पैसे फुकट गेले, अशी भावना या देखील अशा बदलाला विपरीत होत्या. त्यामुळेच सन २००० मध्ये केळकर समितीने सुचवलेली ही सुधारणा प्रत्यक्षात यायला एवढा मोठा काळ गेला.

कुठल्याही सरकारसाठी करसंकलन वाढते असणे हे विकासकामांसाठी महत्त्वाचे असते. भारताला तर दुहेरी कामगिरी साधायची आहे. एकीकडे दशकानुदशके दुर्लक्षित राहिलेल्या पायाभूत क्षेत्रात अद्ययावत सुविधांची निर्मिती करायची आहे; तर दुसरीकडे वित्तीय तूट कमी करून देशावरील कर्जाचा बोजा कमी करायचा आहे. जीएसटीचे दमदार संकलन आणि सातत्याने होणारी वाढ हे यासाठी

अत्यंत मोलाचे आहे. थोडी बाहेरच्या जगात नजर टाकली तर आजच्या घडीला अमेरिकेपासून ते युरोप किंवा जपानपर्यंत असंख्य देशांची सरकारे करोनाकाळात वाढलेले कर्जाचे बोजे हलके करण्यासाठी आपापले कर उत्पन्न वाढवण्यासाठी जंग जंग पछाडत आहेत.

जीएसटीचे दमदार संकलन हे केवळ केंद्र सरकारचे उत्पन्न वाढणे आणि अर्थसंकल्पीय तूट कमी होणे एवढ्यासाठीच महत्त्वाचे नाही; तर त्यातून संपूर्ण देशाचा विकासाचा जोमही दिसून येतो. डिसेंबर २०२३ च्या तिमाहीत ८.४ टक्के विकासदर नोंदवल्यावर आता मार्च २०२४च्या तिमाहीचे विकासाचे आकडे देखील चांगलेच येतील, असे या जीएसटी आकड्यांवरून दिसते आहे. त्यामुळे २०२३–२४ वर्षासाठी आंतरराष्ट्रीय नाणेनिधी किंवा जागतिक बँक इत्यादींच्या अंदाजापेक्षा भारताचा विकासदर अधिक दिसू शकेल. नुकतेच प्रसिद्ध झालेले एप्रिल २०२४ महिन्यासाठीचे 'पर्चेसिंग मॅनेजर्स इंडेक्स'चे आकडेदेखील याला दुजोरा देतात. वस्तू उत्पादन क्षेत्रातील कंपन्यात पर्चेस डिपार्टमेंट सांभाळणाऱ्या अनुभवी व्यवस्थापकांचे हे सर्वेक्षण मोठ्या प्रमाणावर कच्च्या मालाची वाढती मागणी दर्शवतो आहे. कुठलीही कंपनी जेव्हा तिच्या तयार मालाला उठाव असतो तेव्हाच त्यासाठी लागणारा कच्चा माल जास्त प्रमाणात खरेदी करते. त्यामुळे अशा सर्वेक्षणांना अर्थशास्त्रात भविष्याची आधी सूचना देणारे घटक म्हणून मान्यता आहे.

जीएसटीचा आणखी एक परिणाम म्हणजे अनेक लहान कंपन्या किंवा लघुउद्योजक जे पूर्वी करसंकलनाच्या कक्षेबाहेर राहून अर्थार्जन करायचे त्यांना आता जीएसटीसाठी नोंदणी करणे आणि रिटर्न भरणे अनिवार्य होऊ लागले आहे. त्यामुळे औपचारिक अर्थव्यवस्थेत ते समाविष्ट होऊ लागले आहेत. याचा लघु उद्योजकांना होणारा एक फायदा म्हणजे सरकार–प्रमाणित जीएसटी आकडेवारी दाखवून त्यांना आता बँका किंवा तत्सम संस्थात्मक अर्थपुरवठा मिळवता येतो. अन्यथा खेळत्या भांडवलासाठी अ–संस्थात्मक मार्गाने कर्ज घेणे म्हणजे व्याजाचा डोंगर अंगावर ओढवून घेणे अशी परिस्थिती असते. त्या तुलनेने कमी व्याजदराने मिळणारा हा कर्जपुरवठा व्यवसायवृद्धीसाठी फार उपयोगी पडू शकतो. अर्थात अजूनही मोठ्या प्रमाणावर रोखीत व्यवहार चालतात आणि ग्राहकांचा कल देखील कच्ची पावती घेऊन कर टाळण्याकडे असतो.

भारतातील विविध राज्यांचा विचार केल्यास या महिन्याच्या जीएसटी संकलनाच्या आकडेवारीतून उत्तर प्रदेशची विकासाची घोडदौड अधोरेखित झाली आहे. महाराष्ट्र, कर्नाटक आणि गुजरातपाठोपाठ आता उत्तर प्रदेशने तब्बल १९ टक्के वृद्धी नोंदवत तमिळनाडूला मागे टाकत चौथा क्रमांक पटकावला आहे. २०२३–२४ वर्षात सातत्याने तमिळनाडूपेक्षा सरासरी सुमारे १० टक्के कमी जीएसटी संकलन असणारे उत्तर प्रदेश अचानक एप्रिल २०२४मध्ये तमिळनाडूच्या पुढे गेले. उत्तर प्रदेशची ही चमकदार कामगिरी भविष्यात कितपत टिकून राहते, ते आत्ताच सांगणे कठीण आहे. मात्र आर्थिक विकासाची घोडदौड एखाद्या मागास राज्याचे देखील पुनरुत्थान करू शकते, हे यातून अधोरेखित होते. याउलट ईशान्येकडील राज्ये आणि अंदमान, निकोबार किंवा लक्षद्वीपसारख्या केंद्रशासित प्रदेशातील जीएसटी संकलन घटलेले दिसले. सध्या चालू असलेल्या उष्णतेच्या लाटेमुळे जूनच्या तिमाहीत मासिक जीएसटी संकलन घटू शकेल, मात्र पावसाळ्यासोबत ते पुन्हा पूर्वपदाला येईल.

या सगळ्याचा विचार करताना आपण हे लक्षात घ्यायला पाहिजे की, जीएसटीमधून आत्तापर्यंत प्राप्त झालेले यश हे उत्साहवर्धक असले तरी ते काही अंतिम साध्य नव्हे. जीएसटीमध्ये अजूनही अनेक मोठे बदल होणे गरजेचे आहे. पेट्रोलियम पदार्थांना त्याखाली आणणे असो, किंवा जीएसटीच्या अनेकविध दरांऐवजी सर्वच सेवा आणि वस्तूंसाठी एक किंवा दोनच दर लागू करणे असो, दर कमी करून ग्राहकांना कर भरण्यासाठी प्रोत्साहित करणे असो किंवा रिफंड–सहित संपूर्ण प्रणाली सुलभ करण्याविषयी उचलायची पावले असोत, अनेक ठिकाणी सुधारणांना वाव आहे आणि त्या सुधारणा सुयोग्य पद्धतीने होत राहणे हे फार महत्त्वाचे आहे. मात्र, एप्रिल २०२४ चे जीएसटीचे आकडे एवढे नक्कीच दर्शवतात की भारताने सन २०१७ मध्ये उचललेले पाऊल हे योग्य दिशेने होते आणि राजकीय इच्छाशक्ती असेल तर अत्यंत आमूलाग्र स्वरूपाच्या आर्थिक सुधारणा घडवून आणणे आणि त्या सातत्याने सुधारत यशस्वी करणे हे भारताला आणि भारतीयांना नक्कीच जमू शकते. भारताच्या दूरगामी प्रगतीचा पाया मजबूत करण्यासाठी ही क्षमता आवश्यक असेल.

**(सौजन्य: दै. महाराष्ट्र टाईम्स)**



**पुणे– उमेदवार मुरलीधर मोहोळ यांचा प्रचार– उपस्थिती–** केंद्रीय रस्ते व महामार्ग मंत्री नितीन गडकरी, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, खा. मेधा कुलकर्णी, हेमंत रासणे आदी.



**शिरूर– महायुती उमेदवार शिवाजीराव आढळराव पाटील यांचा प्रचार– उपस्थिती–** केंद्रीय रस्ते व महामार्ग मंत्री नितीन गडकरी, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे आदी.



**जळगाव– उमेदवार स्मिता वाघ यांचा प्रचार– उपस्थिती–** केंद्रीय रस्ते व महामार्ग मंत्री नितीन गडकरी, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील, मदत व पुनर्वसन मंत्री अनिल पाटील, आ.मंगेश चव्हाण, जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर जळकीकर आदी.



**चोपडा (जि.जळगाव) – उमेदवार रक्षा खळसे यांचा प्रचार– उपस्थिती–** गडचिरोली जिल्हा सरचिटणीस प्रकाश गेडाम, एसटी मोर्चाचे प्रदेश चिटणीस पिंटुभाऊ पावरा आदी.

# नमो संवाद, प्रचार फेऱ्या



**धुळे– डॉ. सुभाष भामरे यांचा प्रचार– उपस्थिती–** आ.दिलीप बोरसे, नाशिक जिल्हा महिला मोर्चा अध्यक्षा सुरेखा भुसे, सुवर्णा सोनवणे, नलिनी पाटील, साधना वाजपेयी, मनीषा खैरनार, रजिया शेख, ज्योती अग्रवाल, प्रिती भावसार, हर्षाली चव्हाण, मनीषा पगारे, वैशाली मुळे, पूजा पवार, सिंधुताई निकम आदी.




**कोल्हापूर– ज्येष्ठ नागरिक व सांस्कृतिक आघाडी मेळावा– महायुतीचे उमेदवार संजय मंडलिक यांचा प्रचार– उपस्थिती–** प्रदेश सचिव महेश जाधव, जिल्हाध्यक्ष विजय जाधव, गायत्री राऊत, नरेंद्र पाटील, अशोक लोहार, सतीश अंबर्डेकर, दिलीप मैत्राणी, सुरेश खिस्ते आदी.



**पुणे– मुरलीधर मोहोळ यांचा प्रचार– उपस्थिती–** गणेश काका जगताप, प्रसाद कुलकर्णी, आशिष कांटे, श्रद्धा प्रभुणे, शाम सातपुते, सीताराम खाडे, प्रमोद होले, मंदार महाडिक, कुंदन तळेकर, वंदना सिंग, जान्हवी जोशी आदी.



**पुणे– उपस्थिती–** गणेश काका जगताप, समाधान गायकवाड, पुणे शहर संयोजक अशिष कांटे, सहसंयोजिका मनिषा धुमाळ, पश्चिम महाराष्ट्र सोशल मिडिया प्रमुख ओमराजे भोसले आदी.



**पुणे– उमेदवार मुरलीधर मोहोळ यांच्या संकल्प पत्राचे प्रकाशन– उपस्थिती–** प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, खा. मेधा कुलकर्णी, प्रदेश सह–मुख्य प्रवक्ते आशिष देशमुख, पुणे महानगराध्यक्ष धीरज घाटे आदी.






**पुणे– अल्पसंख्याक समाज मेळावा– उपस्थिती–** प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, प्रदेश प्रवक्ते अली दारुवाला, श्रीनाथ भिमाले आदी.




**पिंपरी–चिंचवड– नमो संवाद मेळावा– उपस्थिती–** प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, आ.महेश लांडगे, अमर साबळे, शहराध्यक्ष शंकर जगताप आदी.



**भिवंडी – नमो संवाद मेळावा– उपस्थिती–** प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, ज्येष्ठ नेते जगन्नाथ पाटील, आ.किसन कथोरे, हेमंत म्हात्रे आदी.



**पालघर – नमो संवाद मेळावा– उपस्थिती–** प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, प्रदेश सरचिटणीस माधवी नाईक, खा.डॉ.राजेंद्र गावित आदी.




**बीड– उपस्थिती–** पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय मंत्री रामदास आठवले, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, उमेदवार पंकजा मुंडे, कृषी मंत्री धनंजय मुंडे, आ. नमिता मुंदडा, जिल्हाध्यक्ष राजेंद्र म्हस्के आदी.



**नाशिक– उपस्थिती–** पंतप्रधान नरेंद्र मोदी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, उमेदवार डॉ.भारती पवार, हेमंत गोडसे, आ. राहुल ढिकले आदी.



**जालना– उपस्थिती–** केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ.भागवत कराड, उमेदवार व रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे–पाटील, खा. डॉ.अजित गोपछडे आदी.

RNI NO. MAHMAR/2018/76180
Posting Under the Registration No.MCS/221/2024-26, License To Post Without Prepayment,
WPP Licence No.: MR/Tech/WPP-351/South/2024-26, Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001.
Published on 1st and 16th of every month and Posted on 8th, 9th, 10th and 23rd, 24th, 25th of every month.

https://www.facebook.com/bjpmanogat @manogatbjp













**प्रति,**

**प्रेषक,**
**कार्यालय मंत्री :**
भारतीय जनता पार्टी,
महाराष्ट्र प्रदेश कार्यालय,
वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई-२०
दूरध्वनी : ०२२-२२०२२०५०, फॅक्स : ०२२-२२८५२३०५
ई मेल- bjpmaha.manogat@gmail.com